रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १७ ◆ अंक ३४२
www.ramprahar.com

रविवार २९ जून २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

‘फसव्या महाविकास आघाडीत राहण्यापेक्षा भाजपमध्ये प्रवेश’/२

हरिहरेश्वर समुद्रकिनाऱ्याची सुरक्षा राम भरोसे/७

प्रज्ञानंदची जेतेपदावर मोहोर; ‘लाईव्ह रेटिंग’मध्ये अव्वल/८

## ड्रोनद्वारे राज्यातील खाणींचे होणार सर्वेक्षण



**नागपूर :** राज्यात खाणींमधून मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या उत्खननावर नियंत्रण मिळवून महसूल विभागाचे उत्पन्न वाढवण्यासाठी आता अत्याधुनिक लिडार या ड्रोन तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येणार आहे. यासाठी पुणे जिल्ह्यात ९७ खाणींसाठी प्रायोगिक प्रकल्प सुरू करण्यात येणार आहे. तो संपूर्ण राज्यात राबविण्यात येणार असल्याची माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. राज्यात मुरूम, वाळू, दगड यांसारख्या गौण खनिजांचे मोठ्या प्रमाणावर उत्खनन होत असले तरी त्यातून अपेक्षित महसूल मिळत नाही. कागदावरील आकडेवारी आणि प्रत्यक्ष उत्खनन यामध्ये मोठा फरक आढळतो. यावर तोडगा म्हणून ‘लिडार’ तंत्रज्ञानाने सुसज्ज ड्रोनच्या माध्यमातून खाण क्षेत्राचे अचूक मोजमाप व नकाशांकन करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे.

# संविधानातील मूल्यांचा अंगीकार व्हावा

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन

**नागपूर : प्रतिनिधी**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जागतिक मूल्य आणि भारतीय शाश्वत मूल्य यांची उत्तम सांगड घालत भारतीय संविधानाची निर्मिती केली असून उद्देशिका हा संविधानाचा गाभा आहे. उद्देशिकेतील मूल्यांचा अंगीकार देशातील नागरिकांनी करावा त्यामुळे देशातील ९० टक्के प्रश्न कायमचे सुटतील, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी (दि.२८) येथे केले.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्कूल ऑफ लॉच्या परिसरात संविधान उद्देशिका पार्क आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे लोकार्पण सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश भूषण गवई, केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले, त्यावेळी ते बोलत होते. या वेळी महसूल मंत्री



चंद्रशेखर बावनकुळे, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट, विधी व न्याय राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, सामाजिक न्याय विभागाचे प्रमुख सचिव हर्षदीप कांबळे, उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाचे प्रशासकीय न्यायमूर्ती नितीन सांबरे, माजी मंत्री नितीन राऊत, माजी खासदार जोगेंद्र कवाडे, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या प्रभारी कुलगुरू डॉ. माधवी खोडे-चवरे, संविधान उद्देशिका पार्क समितीचे अध्यक्ष गिरीष गांधी आणि या समितीचे सदस्य उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयात भारतीय संविधानाचे धडे गिरविले व संवैधानिक मूल्य कृतीमध्ये आणले त्याच महाविद्यालयात संविधान उद्देशिका पार्क आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण होत आहे. संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षात या पार्कची कार्यपूर्ती होऊन जनतेसाठी खुला होत आहे. भारतीय संविधानाने सक्षम लोकशाहीची रचना करून येथील नागरिकांना अभिव्यक्ती स्वातंत्र्य, मूलभूत अधिकार, समान संधीचा अधिकार व न्याय मिळवून देण्याची व्यवस्था केली आहे. यामुळेच संविधानातील मूल्यांवर चालत भारताने जागतिक स्तरावर चौथ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था होण्याचा मान मिळविला आहे.

उद्देशिका संविधानाचा गाभा आहे. यातील निहीत मूल्यांचा सर्व नागरिकांनी अंगिकार करण्याची गरज आहे व संविधान उद्देशिका पार्कच्या माध्यमातून याची प्रेरणा येथे भेट देण्याऱ्या प्रत्येकाला मिळेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

## पनवेल तक्का येथील फुटपाथवर बास्केटमध्ये आढळले अर्भक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल शहरातील तक्का परिसरात शनिवारी (दि.२८) सकाळी एक मन हेलावून टाकणारी घटना उघडकीस आली. मुलींच्या बालगृहाबाहेर फुटपाथवर एका बास्केटमध्ये ठेवलेले नवजात अर्भक आढळून आले, त्यासोबत इंग्रजी भाषेत एक चिठ्ठी सापडली असून बाळाला सांभाळण्यास असमर्थ असल्याचे या चिठ्ठीतून पालकांनी म्हटले आहे. तर या मुलीच्या भवितव्याच्या अनुषंगाने योग्य ती पावले उचलली जातील, अशी ग्वाही आमदार प्रशांत ठाकूर यांनी दिली आहे.

शनिवारी सकाळी तक्का परिसरातील नागरिकांना एका बास्केटमधून बाळाच्या रडण्याचा आवाज आला. येथील नागरिकांनी आवाजाच्या दिशेने जाऊन पाहिले असता, त्यांना बास्केटमध्ये एक नवजात बाळ दिसले. नागरिकांनी क्षणाचाही विलंब न लावता तत्काळ पनवेल शहर पोलिसांना या घटनेची माहिती दिली. घटनेची माहिती मिळताच पोलीस पथक घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी बाळाला ताब्यात घेऊन उपचारासाठी पनवेलच्या उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. सध्या बाळाची प्रकृती स्थिर असल्याची माहिती रुग्णालय प्रशासनाने दिली आहे. या चिठ्ठीतून बाळाच्या पालकांची बिकट मानसिक आणि आर्थिक परिस्थिती समोर आली आहे, मात्र अशा प्रकारे बाळाला सोडून देणे हा गंभीर गुन्हा असल्याने, पनवेल शहर पोलिसांनी



याप्रकरणी अज्ञात व्यक्तींविरोधात गुन्हा दाखल केला आहे. बाळाच्या पालकांचा शोध घेण्यासाठी तपास सुरू करण्यात आला असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे. **(पान २ वर..)**

### नवजात मुलीच्या भवितव्याच्या अनुषंगाने योग्य ती पावले उचलणार

■ आमदार प्रशांत ठाकूर यांची ग्वाही



सर्व देशवासीयांच्या दृष्टिकोनातून अतिशय चिंताजनक आणि हृदयद्रावक अशी ही घटना आहे. बाळ अशा पद्धतीने सोडून दिले जाणे विशेषत्वाने ते बाळ एक मुलगी आहे असे समजते त्या वेळेला आपल्या सर्वांची आणखी चिंता वाढवणारी हि घटना आहे. नवजात बाळाचा त्याग करावा असे बाळाच्या आईवडिलांना का वाटावा?. काय त्यांची मनोवृत्ती आहे हे कळायला मार्ग नाही. नेमके कारण काय आहे हे कळत नाही. हे बाळ पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. पोलीस तपासात कारण निष्पन्न होईलच. आरोग्याच्या दृष्टीने बाळाची रुग्णालयात तपासणी झाली पुढे अलिबाग येथे तपासणी होणार आहे. जर तब्येतेची कारण आहे किंवा काहीही इतर कारण असले तरी अशा बाबतीत समाज मदत करत राहतो. आता जोपर्यंत बाळाच्या आई वडिलांचा शोध लागत नाही तोपर्यंत आणि आवश्यकता आहे तो पर्यंत समाज निश्चित पुढे येऊ शकतो. या बाळाच्या भविष्याच्या दृष्टिकोनातून व्यक्तिशः मी आणि आमचे सर्व सहकारी जी काही आर्थिक बाजू उचलायची आहे ती आम्ही नक्कीच उचलू. तसेच या संदर्भामध्ये मी पोलिसांशी समन्वय करणार असून या बाळाचा सांभाळ, उपचार करण्याच्या दृष्टिकोनातून जे काही आमच्याकडून करता येईल ते मी करेन. या मुलीच्या भवितव्याच्या अनुषंगाने योग्य ती पावले उचलली जातील, असे आमदार प्रशांत ठाकूर यांनी सांगितले आहे.

## पंतप्रधान मोदींच्या ‘मन की बात’चे करंजाडेत ११ ठिकाणी थेट प्रसारण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**




माननीय नरेंद्र मोदी हे पंतप्रधान झाल्यापासून प्रत्येक महिन्याच्या शेवटच्या रविवारी देशवासियांना उद्देशून ‘मन की बात’मधुन संवाद साधतात. या कार्यक्रमाचे कौतुक संपूर्ण जगभर होते आहे. तसेच ११ वर्षे राष्ट्र सेवेची, समर्पणाची, सुशासनाची मा. पंतप्रधान मोदीजींच्या ’मन की बात’द्वारे थेट संवाद रविवारी (दि.२९) सकाळी ११ वाजता भारतीयांशी साधणार आहेत. त्या निमित्ताने मन की बात या कार्यक्रमाचे ११ ठिकाणी थेट प्रसारण करंजाडे वासियांसाठी करंजाडे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच भाजप युवा नेते रामेश्वर आंग्रे यांनी आयोजित केले आहे.

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, माजी नगराध्यक्ष भाजप नेते जे.एम म्हात्रे, माजी विरोधी पक्षनेते भाजप नेते प्रितम म्हात्रे, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी नगरसेवक गणेश कडू यांच्या मार्गदर्शनाखाली करंजाडे वसाहतीत ११ ठिकाणी मन की बात या कार्यक्रमाचे जाहीर प्रसारण करण्यात येणार आहे. त्यामुळे करंजाडे वसाहतीतील सर्व नागरिकांनी या मन की बात कार्यक्रमाच्या प्रसारणात सहभागी व्हावे असे आवाहन भाजप माजी सरपंच रामेश्वर आंग्रे यांनी केले आहे. **(पान २ वर..)**

## ‘कांटा लगा’गर्ल शेफाली जरीवालाचे निधन



**मुंबई : प्रतिनिधी**

मॉडेल आणि अभिनेत्री शेफाली जरीवालाचे शनिवारी (दि.२८) निधन झाले आहे. शेफाली मुंबईतील अंधेरी लोखंडवाला भागात राहत होती. अचानक रात्री ११ वाजण्याच्या सुमारास तिने छातीत दुखण्याची तक्रार केली. तिचा पती पराग त्यागी तिला जवळच्या रुग्णालयात घेऊन गेला असता डॉक्टरांनी उपचार सुरू करण्यापूर्वी तिला मृत घोषित केले.

‘कांटा लगा गर्ल’ म्हणून प्रसिद्ध असलेली शेफाली ४२ वर्षांची होती. तिने ‘मुझसे शादी करोगी’ चित्रपटात अक्षय कुमार आणि सलमान खानसोबत काम केले होते. शेफाली जरीवालाच्या मृत्यूच्या बातमीने चाहत्यांना धक्का बसला आहे. शेफालीने लोकप्रिय रिॲलिटी शो ‘बिग बॉस १३’ मध्येही भाग घेतला होता. तिच्या डान्ससाठीही ती चाहत्यांमध्ये खूप लोकप्रिय होती.

## निवडक

### वैजापुरात महिला कीर्तनकाराची आश्रमातच दगडाने ठेचून हत्या

**छत्रपती संभाजीनगर :** वैजापूर तालुक्यातील चिंचडगाव शिवारात असलेल्या एका आश्रमात महाराज ह.भ.प. संगीताताई पवार या महिला कीर्तनकाराची दगडाने ठेचून हत्या करण्यात आल्याचे पोलीस तपासात उघड झाले. याप्रकरणी अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी पुढील तपासाला सुरुवात केली आहे. आश्रमात घुसून संगीताताई यांची हत्या करण्यात आली आहे.

### बॉम्बस्फोटात १३हून अधिक पाकिस्तानी सैनिक ठार

**कराची :** पाकिस्तानच्या खैबर पख्तूनख्वा भागातील उत्तरी वजीरिस्तान इथं आत्मघातकी हल्ला झाला आहे. या बॉम्बस्फोटात १३ हून अधिक पाकिस्तानी सैनिक ठार झाले तर २० हून अधिक जखमी झाले आहेत. मीर अली खादी मार्केटमध्ये झालेल्या या हल्ल्यात जखमींमध्ये १२ हून अधिक महिला आणि लहान मुलांचा समावेश आहे. ज्यांची प्रकृती सध्या चिंताजनक असल्याचे बोलले जाते.

## ते मराठी असतील तर मी काय पंजाबी

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचा ठाकरे बंधूंना टोला

**मुंबई : प्रतिनिधी**

राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे हे हिंदी सक्ती विरोधातल्या मोर्चातही एकत्र येणार आहेत. मराठी माणसाच्या हितासाठी आणि मराठीसाठी आम्ही दोघे एकत्र येऊ शकतो असे दोघांनीही म्हटले होते. दरम्यान ते मराठी असतील तर मी काय पंजाबी आहे का? असा सवाल करत देवेंद्र फडणवीस यांनी राज ठाकरे आणि उद्धव ठाकरेंना टोला लगावला आहे.

आत्ता तरी आमची युती भाजपा, शिवसेना ओरिजनल, राष्ट्रवादी ओरिजनल अशीच आमची युती आहे.



या व्यतिरिक्त कुणी आमच्याबरोबर येत असेल तर आम्ही स्वागत करू, पण आम्ही असा काही निर्णय घेतलेला नाही असे देवेंद्र फडणवीस म्हणाले तर ठाकरे बंधूबाबतही देवेंद्र फडणवीस यांनी भाष्य केले.

ठाकरे बंधूंचं एकत्र येणं आणि मुंबई हे महाराष्ट्राचे कुरुक्षेत्र ठरले आहे का? असे विचारले असता देवेंद्र फडणवीस म्हणाले, ते मराठी आहेत तर मी कुठे पंजाबी आहे? मी कुठे गुजरातीच आहे? मी पण मराठीच आहे. मराठी माणूसही आमच्या बरोबर आहे आणि गैर मराठीही आमच्या बरोबर आहे. जोपर्यंत आम्ही चांगले काम करत राहू तोपर्यंत सगळे आम्हाला मतदान करतील. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एका मुलाखत दिली. त्या मुलाखतीत त्यांनी हे भाष्य केले.

## मुंबई बॉम्बस्फोटातील दहशतवादी साकिब नाचनचा मृत्यू

**ठाणे : प्रतिनिधी**



कुविख्यात दहशतवादी म्हणून ओळखला जाणारा साकिब नाचण याचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. भिवंडी तालुक्यातील पडघा-बोरिवली हे साकिब नाचण याचं मूळगाव आहे. त्यानंतर, बोरिवली आणि पडघा या दोन्ही ठिकाणी २०० हून अधिक पोलिसांचा बंदोबस्त तैनात करण्यात आला असून गावात येणाऱ्या प्रत्येक वाहनांची तपासणी सुरू केली आहे.

मुंबई सिरीयल बॉम्ब ब्लास्टमध्ये साकीब नाचन हा मुख्य आरोपी होता. त्यानंतर ISISI मोड्युलमध्ये डिसेंबर २०२३ मध्ये NIA ने पुन्हा त्याला अटक केली होती. दिल्ली येथील तिहार जेलमध्ये ठेवण्यात आले होते, मात्र तिथे ब्रेन स्टॉक आल्याने साबिकला दीनदयाल रुग्णालयात दाखल करण्यात आले होते, मात्र उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला आहे.



## भक्तिमय वातावरणात पहिले गोल रिंगण

**इंदापूर : प्रतिनिधी**

ज्ञानोबा-तुकारामच्या जयघोषात जगद्गुरू संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याच्या मानाच्या अश्वाचे पहिले गोल रिंगण बेलवाडी (ता. इंदापूर) येथे शनिवारी (दि.२८) भक्तिमय वातावरणामध्ये उत्साहात झाले.

शनिवारी सकाळी साडेसात वाजता ज्ञानोबा-तुकारामच्या जयघोषात सुरुवातीला नगारखाना, नंतर सर्व दिंड्या व पालखी सोहळा रिंगण स्थळामध्ये दाखल झाला. अश्वांचे पूजन क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते करण्यात आले. पालखीच्या अश्वांच्या रिंगणाला सुरुवात झाली. मानाच्या अश्वाने पालखीला तीन प्रदक्षिणा पूर्ण करून पालखीचे दर्शन घेतले व डोळ्याचे पारणे फेडणारा रिंगण सोहळा पार पडला.

## मोबाईल कॅमेऱ्यातून खासगी क्षण बघणाऱ्या भोंदूबाबाला अटक

**पुणे : प्रतिनिधी**



पुण्यात एका भोंदूबाबाच्या कारनाम्यामुळे एकच खळबळ उडाली आहे. मोबाईलमधील छुप्या ॲपच्या माध्यमातून भक्तांवर नजर ठेवणारा आणि मोबाईल कॅमेऱ्यातून खासगी क्षण बघणाऱ्या भोंदूबाबाला बावधन पोलिसांनी अटक केली आहे.

दरम्यान, प्रसाद ऊर्फ दादा भीमराव तामदार असे अटक केलेल्या २९ वर्षीय भोंदूबाबाचे नाव आहे. त्याच्याविरुद्ध एका ३९ वर्षीय व्यक्तीने बावधन पोलीस स्थानकात तक्रार दाखल केली होती. भोंदूबाबाच्या या प्रकारामुळे भक्तांमध्ये एकच खळबळ उडाली आहे. त्याने असाच प्रकार इतर भक्तांसोबत केला आहे का, याचा पोलीस तपास करत आहेत.

पोलिसांना दिलेल्या तक्रारीनुसार या भोंदूबाबाने त्याच्याकडे दिव्यशक्ती असल्याचे भासवत फिर्यादीला अनेक गोष्टी करण्यास भाग पाडले. या भोंदू बाबाने फिर्यादीच्या मोबाईलमध्ये एक छुपे ॲप डाऊनलोड केले. त्याद्वारे मोबाईलचा ॲक्सेस मिळवला. फिर्यादी आणि त्यांच्या जवळच्या सहकाऱ्यांच्या वैयक्तिक आयुष्याच्या घटनांवर लक्ष ठेवले. इतकेच नाही तर फिर्यादीला अश्लील कृत्य त्याचबरोबर वेश्यागमन करण्यासही भाग पाडले आणि मोबाईल ॲपद्वारे ते पाहिल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. या भोंदूबाबाने आर्थिक फसवणूक केल्याचेही फिर्यादीचे म्हणणे आहे. फिर्यादीबरोबरच इतरही अनेकांना या बाबाने अशीच अनेकांची फसवणूक केल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

एका भक्ताचा मोबाईल सातत्याने गरम होत होता. तेव्हा त्याच्या एका मित्राला त्याने तो दाखवला. या मोबाईलमध्ये एक छुपे ॲप असून त्याच्यावर कोणीतरी पाळत ठेवत असल्याचे मित्राने सांगितले आणि बाबाचे भिंग फुटले.

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्या माध्यमातून विकासकामे

■ वाजे येथे अरुणशेठ भगत यांच्या हस्ते काँक्रीटीकरणाचे भूमिपूजन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल विधानसभा मतदारसंघ आमदार प्रशांत ठाकूर यांच्या माध्यमातून विविध विकासकामे केली जात आहेत. शनिवारी (दि.२८) वाजे ग्रामपंचायतीच्या हद्दीत रस्त्याच्या काँक्रिटीकरणाचे भूमिपूजन भाजपचे ज्येष्ठ नेते अरुणशेठ भगत यांच्या हस्ते झाले. वाजे ग्रामपंचायतमधील टेमघर फाटा ते वाजे बस स्टॉपपर्यंतच्या रस्त्याची काँक्रीटीकरणाचे भूमिपूजन मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले.

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या माध्यमातून वाजे ग्रामपंचायतीच्या हद्दीत वेळोवेळी विविध विकासकामे केली जातात, परंतु ग्रामपंचायतीच्या सरपंच आणि ग्रामस्थांनी हे काम व्यवस्थित होते की नाही याकडे लक्ष दिले पाहिजे. रस्त्याचे काम होत असताना तो रस्ता जास्त काळ टिकून राहील, असे काम झाले पाहिजे असे मत या भूमिपूजन वेळी भाजपचे ज्येष्ठ नेते अरुणशेठ भगत यांनी व्यक्त केले.

या भूमिपूजन सोहळ्याला भाजपचे नेते संजय पाटील, पंचायत समितीचे माजी सदस्य भूपेंद्र पाटील, जिल्हा उपाध्यक्ष राजेंद्र पाटील, सरपंच आनंद ढवळे, वाजे ग्रामपंचायतच्या सरपंच भारती भालेकर, सुनील पाटील, विश्वजीत पाटील, अंकुश पाटील, धनजय पाटील, मुकेश फडके, अप्पा भगीत, राजेश भोईर, राजाराम भालेकर, शाम भालेकर, अंबाजी पाटील, राघो पाटील, शशी भगत, मदन पाटील, पाडू वाघ, वसंत बुवा, काळूराम भोईर, मेघा भगत, हरिचंद्र बुवा वाजेकर, महेंद्र पाटील, प्रमोद भालेकर, गोपीनाथ पाटील, पांडुरंग भगत, वासू भालेकर यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पुण्यतिथी



**पनवेल : स्व. चांगू काना ठाकूर यांच्या पुण्यतिथीनिमित्त दोन दिवस विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि ग्रामस्थ मंडळ शिवाजीनगर यांच्या वतीने करण्यात आले होते. तालुक्यातील शिवाजीनगर येथे श्री समर्थ दासबोध ग्रंथ वाचन, चरित्रामृत ग्रंथाचे पारायण, भजन, प्रवचन, कीर्तन आणि शनिवारी माऊलींवर पुष्पवृष्टी अशा विविध आध्यात्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या दोन दिवसांच्या आध्यात्मिक कार्यक्रमाला लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभली.** (बातमी व अधिक छायाचित्रे पान ६ वर..)

## निवडक

### बेकायदेशीर गुटखा जप्त

**पनवेल :** भिंगारी परिसरातील एका टपरीवर बेकायदेशीर गुटखा विक्री करणाऱ्यावर टपरीवर पनवेल शहर पोलिसांनी छापा टाकला. या वेळी गुटखा जप्त करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार ओएनजीसी कंपनीच्या गेटच्या बाजूला असणाऱ्या किरणा माल विक्रीच्या दुकानामध्ये एक इसम गुटखा व तंबाखुजन्य पदार्थ विक्री करीत असल्याची माहिती मिळाली त्यानुसार पथकाने दुकानामध्ये छापा टाकून तेथील माल जप्त केला.

### इलेक्ट्रीक स्कूटरच्या बॅटरीला आग

**मोहोपाडा :** रसायनी पोलीस ठाण्यासमोर अक्षय प्रकाश अहिरे (वय २६, रा.चांभार्ली) हा तरूण आपल्या इलेक्ट्रीक वार्डविझार्ड इनोव्हेशन अ‍ॅण्ड मोबालिटी लि. कंपनीची वूल्फ मॉडेलची मॅटी ब्लॅक कलर इलेक्ट्रीक स्कूटर (एमएच ४६ सीपी ६५३८) ही चांवढोली येथून सिध्देश्वरी फाटा ते पराडे कॉर्नर या रस्त्याने जात होता. या वेळी इलेक्ट्रीक स्कूटरच्या बॅटरीजवळ अचानक आग लागली. यात फिर्यादी अक्षय अहिरे यांच्या स्कूटरचे संपूर्ण पॅनल, डिक्कीमधील चार्जर पूर्णपणे जळून नुकसान झाले आहे. अचानक बॅटरीजवळ आग लागली असल्यामुळे ही आग लागली आहे. रसायनी पोलीस ठाण्यात याची नोंद करण्यात आली आहे.

### दादासाहेब चोरमले सेवानिवृत्त

**रसायनी :** येथील पोस्टमास्टर दादासाहेब बाबाजी चोरमले



हे रसायनी सब पोस्टमास्तर म्हणून ४० वर्षाच्या सेवेनंतर ३० जून रोजी आपल्या सेवेतून निवृत्त होत आहेत. चोरमले हे मूळ सातारा जिल्ह्यातील लोणंद चे आहेत. ग्रामीण पोस्टाचा म्हणून रसायनीचा मुंबई विभागातून चांगले काम केले आहे. म्हणून रसायनी पोस्ट ऑफिसचा दुसरा नंबर मिळालेला आहे.

### शैक्षणिक किटचे वाटप

**पनवेल :** श्री भैरवदेव विद्यालय व लोकनेते रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालय येथे शनिवारी (दि.२८) उत्सव युवारंभ फौंडेशन, मुंबई यांच्यातर्फे विद्यालयातील आदिवासी, गरीब-गरजू १७५ विद्यार्थ्यांना शैक्षणिक किट वाटप केले. या कार्यक्रमाच्या वेळी उत्सव युवारंभ फौंडेशन मुंबई यातील अमिश शेठ (चेअरमन), मनोज शाह (ट्रस्टी), बीना शेठ, क्रिशा शाह हे सदस्य उपस्थित होते. वह्या, कंपास, पेन्सिल बॉक्स, पट्टी, पेन, रबर या साहित्याचे वाटप केले. विद्यालयातील निलेश पाटील यांनी या कार्यक्रमासाठी विशेष सहकार्य केले. सूत्रसंचालन खुटले मॅडम, प्रास्ताविक मुख्याध्यापक कारंडे व आभार एन.आर. पाटील यांनी मानले.



# सोन्याच्या चेन चोरणारे गजाआड



## दीड लाखाचा मुद्देमाल हस्तगत

**पनवेल : वार्ताहर**

पायी चालत जाणाऱ्या पुरुष व्यक्तीच्या गळ्यातील चेन चोरी करणाऱ्या सराईत गुन्हेगारांना खांदेश्वर पोलीस ठाणे कडून गुन्हा दाखल झाल्यापासून १२ तासाच्या आत जेरबंद करून गुन्हयातील एक लाख ६० हजार रुपये किंमतीचे सोन्याचे दोन चैनी असा मुद्देमाल हस्तगत करण्यात पोलीसांना यश आहे.

नवी मुंबई पोलीस आयुक्तालय परिसरात होत असलेल्या चैन जबरी चोरीच्या गुन्हयाना आळा घालण्यासाठी पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे व पोलीस सह आयुक्त संजय एनपुरे, अप्पर पोलीस आयुक्त दिपक साकोरे तसेच पोलीस उपायुक्त सो, परि ०२, पनवेल प्रशांत मोहिते, सहा पोलीस आयुक्त भाउसाहेब ढोले यांनी वेळोवेळी सुचना केल्या होत्या.

यानुसार सोन्याच्या चैनीच्या चोरीचा टॉप्स करत असताना खांदेश्वर पोलीस ठाण्याच्या पोलिसांनी चोरीच्या गुन्हयाच्या घटनास्थळी तत्काळ भेट देवून वपोनि स्मिता ढाकणे, पोनि (गुन्हे) सचिन परदेशी यांच्या सुचनेनुसार गुप्त बातमीदारांच्या प्राप्त माहीती वरून आरोपी प्रेम संजय सोनवणे (वय २३, रा. मोहोपाडा) आणि तकदिर राजेश साळुंखे (वय २२, नवनाथ नगर झोपडपट्टी, पनवेल) यांना नवीन पनवेल परिसरात, सापळा कारवाई करून शिताफिने ताब्यात घेवून अटक करण्यात आली आहे.

नमूद आरोपीताकडे केलेल्या तपासात आरोपी कडून गुन्हयातील जबरीने चोरी करून नेलेले सोन्याचे चैनी असे एकूण एक लाख ६० हजार रुपये किंमतीचा माल हस्तगत करण्यात आला आहे.

# पनवेलमध्ये आज जॉब इंटरव्ह्यू

## रोजगारासाठी भाजपचा पुढाकार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल, नवी मुंबई, मुंबई परिसरामध्ये नोकरीच्या अनेक संधी तरुणांसाठी उपलब्ध आहेत. त्याचेच एक पाऊल म्हणून भारतीय जनता पार्टी प्रितम जनार्दन म्हात्रे जनसंपर्क कार्यालयाच्या माध्यमातून २९ जून रोजी जॉब इंटरव्ह्यूचे आयोजन करण्यात आले आहे.

२९ जून रोजी सकाळी दहा ते तीन वाजेपर्यंत जॉब इंटरव्ह्यूचे आयोजन करण्यात आले आहे. या वेळी बायकर, बॅक ऑफिस, ऑपरेशन स्टाफ, पिकर पॅकर, फिल्ड ऑडिटर, डिलिव्हरी एक्झिक्यूटिव्ह, सपोर्ट स्टाफ, व्हॅन बॉय, काउंटर स्टाफ इन्स्टॉलर /हेल्पर, फार्मासिस्ट या पदासाठी जॉब इंटरव्यू होणार आहे. पनवेल शहरातील भारतीय जनता पक्ष प्रितम जनार्दन म्हात्रे जनसंपर्क कार्यालय, गुरु शरणम कॉम्प्लेक्स, विश्राळी नाका, मार्केट यार्ड येथे या जॉब इंटरव्यूचे आयोजन करण्यात आले आहे.

आपल्या परिसरात विकासासोबतच नव्याने उद्योगधंदे येत आहे त्याप्रमाणे रोजगार सुद्धा वाढत आहे. या वेळी आपल्या विभागातील तरुणांना संधी मिळावी या उद्देशाने आम्ही भारतीय जनता पक्षाच्या माध्यमातून पुढाकार घेतला आहे, असे माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांनी सांगितले आहे.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात सेमिनार व इंटर्नशिप ड्राइव्ह सत्र

**खारघर : रामप्रहर वृत्त**



जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात करिअर गायडन्स ट्रेनिंग अँड प्लेसमेंट समितीच्या वतीने शुक्रवारी (दि.२७) महाविद्यालयातील सर्व शाखेतील द्वितीय व तृतीय वर्षांच्या विद्यार्थ्यांसाठी उद्योजकता व आंतरराष्ट्रीय करिअरच्या संधींविषयी व नवोदित व्यावसायिकांना मार्गदर्शन करण्याच्या उद्देशाने इंटरचॅम्प या आंतरराष्ट्रीय संस्थेच्या पुढाकाराने एक विशेष सेमिनार व इंटर्नशिप ड्राइव्ह सत्र आयोजित करण्यात आले होते.

या वेळी इंटरचॅम्पचे प्रकल्प संचालक जॉन पीटर यांनी विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय स्तरावरील इंटर्नशिप संधी, उद्योग क्षेत्रातील चालू ट्रेंड्स, विविध प्रकल्पांमध्ये सहभाग घेण्याची प्रक्रिया व त्यासाठी लागणाऱ्या कौशल्यांबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. यावेळी त्यांनी खरे ज्ञान हे केवळ पुस्तकी शिक्षणात नसून, प्रत्यक्ष अनुभवातून मिळते, असे सांगत उपस्थितांना उद्योग व व्यवस्थापन क्षेत्रातील प्रत्यक्ष अनुभव घेण्याचे महत्त्व समजावले.

या सत्रात इंटर्नशिपसाठी विद्यार्थ्यांची निवड कशी केली जाते तसेच विविध विभागांमध्ये इच्छुक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवता येतो तसेच त्यांच्या कौशल्यांची व व्यावसायिक दृष्टिकोनाची चाचणी कशी घेतली याविषयी विद्यार्थ्यांना चांगल्या प्रकारे मोलाचे मार्गदर्शन केले. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. माहेश्वरी झिरपे यांनी या सेमिनार व इंटरनशिप सत्राचे आयोजन केल्याबद्दल करियर गायडन्स ट्रेनिंग व प्लेसमेंट समितीतील सर्व प्राध्यापक तसेच सहभागी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या.

या सेमिनार व इंटरनॅशनल सत्राचे आयोजन प्रा. अर्पिता नायक (समन्वयक, करिअर गायडन्स ट्रेनिंग अँड प्लेसमेंट समिती) यांनी केली तसेच समितीतील इतर सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांनी उपस्थित राहून सहकार्य केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. राहुल कांबळे यांनी केले तसेच कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांचे आभार मानले.



**पनवेल : शहर वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांचे वाढदिवसानिमित्त भाजप उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी, जिल्हा सरचिटणीस नितिन पाटील यांनी अभिष्टचिंतन केले. या वेळी त्यांच्या सोबत भाजप पनवेल शहर पदाधिकारी रूपेश नागवेकर, प्रितम म्हात्रे, केदार भगत, उमेश इनामदार, प्रशांत पाटील आदी उपस्थित होते.**



**पनवेल : भाजप उत्तर रायगड जिल्हा ओबीसी मोर्चा अध्यक्ष राजेश गायकर यांना वाढदिवसानिमित्त सोशल मीडिया सेल संयोजक तथा ओबीसी मोर्चा जिल्हा संयोजक प्रसाद हनुमंते, ओबीसी मोर्चा जिल्हा चिटणीस प्रसाद म्हात्रे, सद्दाम बागबान, सुरज पावणेकर, गजानन जोशी आणि निवृत्त बीएसएनएल अधिकारी बिरजा पाधी आदी उपस्थित होते.**



**कामोठे : पुरातन श्री गणेश मंदिरा ट्रस्टच्या वतीने प्लॉट् नं ५ सेक्टर ३५ मॅगो गार्डनमध्ये झाडे लावण्यात आली. या वेळी अध्यक्ष प्रकाश पाटील, उपाध्यक्ष विजय चिपळेकर, कामोठे शहर अध्यक्ष विकास घरत, प्रदीप भगत, रवि गोवारी, विकास टेकवडे आदी उपस्थित होते.**








**पनवेल : भाजप युवा मोर्चाचे सचिव शुभम पाटील यांचा वाढदिवस शुक्रवारी साजरा झाला. यानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची भेट घेऊनआर्शिवाद घेतले. या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी पुष्पगुच्छ देऊन शुभम पाटील यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. तसेच भाजपचे ज्येष्ठ नेते अरुणशेठ भगत यांनीही गव्हाण येथे पुष्पगुच्छ देऊन वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.**



**पनवेल : आपल्या सहज सुंदर शब्दांनी रसिक मान्य झालेल्या गव्हाण येथील कवी आणि गीतकार रामनाथ कोळी यांना पीपल्स इन्स्पायर अवॉर्ड आणि नेल्सन मंडेला यांच्या नावाने प्रतिष्ठेचा पुरस्कार भारत सरकार एमएसएमइ प्रॉपर्टी हिल यांच्या वतीने काही दिवसांपूर्वी देण्यात आला. सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना हा पुरस्कार दिला जातो शनिवारी रामनाथ कोळी यांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची सदिच्छा भेट घेत त्यांचे आशीर्वाद घेतले. या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनीही रामनाथ कोळी यांना मिळालेल्या पुरस्काराचे कौतुक केले. कोळी समाजाचे नेते विश्वनाथ कोळी, भाजपचे युवा नेते विनायक कोळी यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.**

# खारघर प्राथमिक आरोग्य केंद्रात मोफत बहुविशेषज्ञाची आरोग्य सेवा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



पनवेल महानगरपालिकेच्या खारघमधील सेक्टर १५येथील नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र ५ येथे एमजीएम वैद्यकिय महाविद्यालय, रूग्णालयआणि रिसर्च सेंटर वाशी यांच्या संयुक्त विद्यमाने दर महिन्याच्या चौथ्या गुरूवारी बहुविशेषज्ञांच्या वतीने मोफत तपासणी केली जाणार आहे. या सुविधेचा नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

पनवेलकरांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी महापालिका कायमच तत्पर असते. आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली २३ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र, ६ आरोग्यवर्धिनी केंद्र व दोन आपला दवाखाना यांच्या माध्यमातून विविध आरोग्य सुविधा नागरिकांना दिल्या जात आहेत. खारघर नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र ५ येथे आता 'बहुविशेषज्ञांच्या वतीने मोफत तपासणी' या नवीन सुविधेची भर घालण्यात आली आहे. नुकताच या सुविधेचा शुभारंभ कार्यक्रम मुख्य वैद्यकिय आरोग्य अधिकारी डॉ. आनंद गोसावी यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला. या वेळी आरोग्य केंद्राचे वैद्यकिय अधिकारी डॉ. उमेश ऐगल व एमजीएमचे तज्ज्ञ व वैद्यकिय अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र ५ येथे एमजीएम वैद्यकिय महाविद्यालय, रूग्णालयआणि रिसर्च सेंटर वाशी यांच्या संयुक्त विद्यमाने दर महिन्याच्या चौथ्या गुरूवारी सकाळी १० ते १ या वेळेत बहुविशेषज्ञ नाक घसा तज्ज्ञ, नेत्रचिकित्सा, स्त्री रोग तज्ज्ञ, त्वचारोग तज्ज्ञ, अस्थिरोग तज्ज्ञ, बालरोग तज्ज्ञ आरोग्य सेवा देणार येणार आहे .तसेच महानगरपालिकेच्या खारघर नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र ५ येथे रोज सकाळी ९.३० ते १.०० या वेळेत मोफत रक्त चाचणी करण्यात येत आहे. या सुविधेचा लाभ नागरिकांनी घ्यावा, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात येत आहे.

### गरोदर मातांची मोफत सोनोग्राफी

*गरोदर मातांची काळजी घेण्याच्या दृष्टीने पनवेल महानगरपालिकेच्या खारघरमधील नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र ५येथे 'प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व योजना' राबविण्यात येत असून दर महिन्याच्या ९ तारखेला स्त्री रोग तज्ज्ञाचे मार्गदर्शन गरोदर मातांना देण्यात येत आहे. तसेच दर मंगळवारी व शुक्रवारी सकाळी १०.०० ते १ यावेळेत गरोदर मातांची मोफत सोनोग्राफी करण्यात येत आहे.*



**उलवे : येथे सेक्टर २१ येथील बंधन स्वीट्सचे उद्घाटन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते झाले. या वेळी वहाळ साई मंदिरचे अध्यक्ष रविशेठ पाटील, विभागीय अध्यक्ष तथा वहाळचे माजी उपसरपंच अमर म्हात्रे, संकल्प घरत, निलेश खारकर, किशोर पाटील, संतोष तुडमे, अवधेश महतो, अ‍ॅड. सुनील कुमार मौर्य, देवालय मित्रा, सुहास गोंधळी, स.पी.पाटील, अवनीश सिंग, मनोज मौर्य आदी उपस्थित होते.**

# 'सीकेटी'मध्ये अंमली पदार्थ सेवन विरोधी दिन

**पनवेल: प्रतिनिधी**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनी येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स स्वायत्त महाविद्यालयातील नॅशनल कॅडेटस् कॉर्प्स विभागाकडून आंतरराष्ट्रीय अंमली पदार्थ सेवन विरोधी दिनानिमित्त जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले.

अंमली पदार्थांच्या सेवनामुळे व्यक्तीच्या आरोग्यावर आणि सामाजिक जीवनावर होणारे गंभीर परिणामांवर एन.सी.सी. कॅडेट्सनी प्रकाश टाकला. 'नशेला नाही, आयुष्याला होय' असा संकल्प घेत विद्यार्थ्यांनी अंमली पदार्थमुक्त जीवनाशैली अंगीकारण्यासाठी उपस्थित जनसमुदायास प्रेरित केले. तसेच या जनजागृती रॅलीसोबतच गरजू लोकांना कपडे वाटप करण्याचा उपक्रमही राबविण्यात आला. एन.सी.सी. कॅडेट्सच्या



पुढाकाराने संकलित केलेल्या कपड्यांचे वाटप करत सामाजिक बांधिलकीचा ऋणानुबंध आणखीन दृढ केला. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली लेफ्टनंट प्रा. नीलिमा तिदार, सी.टी.ओ. डॉ. जितेंद्र पावरा, सी.टी.ओ. प्रा.सागर व्यवहारे यांनी परिश्रम घेतले.








# कियारा अडवानी खरंच मीनाकुमारी दिसेल?

झूम प्रहर
दिलीप ठाकूर
चित्रपट समीक्षक

चरित्रपट अर्थात बायोपिक हे सर्वात कसोटीचे, कौशल्याचे, कसब असलेली निर्मिती. भरपूर मेहनत घ्यायची तयारी हवी.

ज्याचं चरित्र (वा आयुष्य) मांडायचयं तसं दिसण्यापासून हे आव्हान सुरू होते. आज मेकअपचं तंत्र विकसित झाले आहे, व्हीएफएक्स रुळलयं, एआय ने बरेच काही साध्य होतेय. जुना काळ ग्राफिक्सने उभा करता येतोय. पण त्या कलाकाराला ती व्यक्ती साकारताना बरेच भान ठेवावेच लागते. कारण तुलना होणे हे स्वाभाविक आहेच. मिलन लुथरिपा दिग्दर्शित डर्टी पिक्चरमध्ये विद्या बालनने सिल्क स्मिताचे वादळी आयुष्य साकारले, पण ती तीक्ष्ण नजर दाखवता आली नाही. तीच तर सिल्क स्मिताची खरी ओळख.

आता कियारा अडवाणी मीनाकुमारी साकारणार म्हटल्यावर तर जास्तच प्रश्न पडतात. दिग्दर्शक कमाल अमरोही व मीनाकुमारी या पती व पत्नीच्या नात्यावर फोकस टाकणारा कमल और मीना हा चरित्रपट बनतोय. त्यात मीनाकुमारीचे अभिनेत्री असणे जास्त महत्वाचे.

आजच्या ग्लोबल युगातील डिजिटल पिढीला भारतीय चित्रपटसृष्टीतील एक अतिशय संवेदनशील अभिनेत्री मीनाकुमारी कदाचित माहित नसेल. अथवा आजच्या प्रथेनुसार त्यांनी एव्हाना गुगलवर जात मीनाकुमारीची माहिती व फोटो यावर नजर टाकलीही असेल. मीनाकुमारी पाह्यची तर रुपेरी पडद्यावर. (गुगलवर संदर्भ, माहिती व तपशील सापडतील, मीनाकुमारीचे अष्टपैलुत्व दिसणार नाही.)

पन्नास व साठचे दशक हिंदी चित्रपटसृष्टीचा सुवर्ण काळ. त्यात नर्गिस, मीनाकुमारी व मधुबाला या सर्वोत्कृष्ट तीन लोकप्रिय अभिनेत्री. अष्टपैलू व अभिनयनिपूण. अनेकदा नायकांनाही भारी पडत. मीनाकुमारी ट्रॅजेडी क्वीन म्हणून ओळखली गेली. खरं तर ती अष्टपैलू. पण त्या काळात लोकप्रिय चित्रपटातील भूमिकेनुसार कलाकार प्रतिमा (इमेज) चिकटली जाई. मग वाट्याला त्याच स्वरुपाच्या भूमिका येत. मीनाकुमारीच्या अनेक भूमिका गाजल्या. विजय भट्ट दिग्दर्शित बैजू बावरा (१९५२) मधील गौरी, बिमल रॉय दिग्दर्शित परिणिता मधील शीर्षक भूमिका, बी. आर. चोप्रा दिग्दर्शित चांदनी चौक या मुस्लिम सोशल चित्रपटातील झरीना, श्रीमुलू नायडू दिग्दर्शित आझाद (१९५५) मधील शोभा, आर. सी. तलवार दिग्दर्शित मेमसाब (१९५६) मधील शीर्षक भूमिका, एल. व्ही. प्रसाद दिग्दर्शित शारदा ( १९५७) मधील शीर्षक भूमिका, देवेंद्र गोयल दिग्दर्शित चिराग कहा रोशनी कहा (१९५९) मधील रत्ना, किशोर साहू दिग्दर्शित दिल अपना और प्रीत पराई (१९६०) मधील करुणा, फणी मुजुमदार दिग्दर्शित आरतीमधील आरती, श्रीधर दिग्दर्शित दिल एक मंदिर मधील सीता, हृषिकेश मुखर्जी दिग्दर्शित सांज और संवेरा ओ. पी. रल्हन दिग्दर्शित फूल और पत्थर गुलजार दिग्दर्शित मेरे अपने (१९७१) मधील आनंदी देवी, दुलाल गुहा दिग्दर्शित दुश्मन मधील वृध्दा, कमाल अमरोही दिग्दर्शित पाकिजा (१९७२) मधील साहिबजा....अबब, एकाच कारकिर्दीत असा जबरदस्त परफॉर्मन्स. यातील पन्नासच्या दशकातील सगळेच आणि साठच्या दशकातील सुरुवातीचे चित्रपट कृष्ण धवल अर्थात ब्लॅक अँड व्हाईट आहेत. या प्रवासात त्या काळातील जवळपास सर्वच आघाडीच्या दिग्दर्शकांनी मीनाकुमारीच्या अफाट गुणवत्तेला वाव दिला. अभिनय प्रशिक्षण केंद्रात मीनाकुमारीचे काही चित्रपट अभ्यासक्रमात हवेत. बरेच काही शिकता येईल. कियारा अडवाणीने हे सगळेच चित्रपट पाहिले तर तिला मीनाकुमारी साकारणे म्हणजे काय हे समजेल.



पाकिजा निर्मितीच्या काळातच मीनाकुमारीचे आजारपण बळावले. त्यामुळेच काही लॉन्ग शॉटस तिच्या डबलवर चित्रीत करावे लागले. चित्रपट पूर्ण झाल्यावर मुंबईत चार फेब्रुवारी १९७२ रोजी प्रदर्शित झाला. विशेष उल्लेखनीय गोष्ट, पाकिजा एकाच वेळेस दक्षिण मुंबईतील रिगल, लिबर्टी व मराठा मंदिर या चित्रपटगृहात प्रदर्शित करण्यात आला. मराठा मंदिर हेच त्याचे मुख्य चित्रपटगृह. तेथील भव्य दिमाखदार डेकोरेशनपासूनच पाकिजा चर्चेत. पण फर्स्ट शोपासूनच पब्लिक रिपोर्ट नरम. गाणी लोकप्रिय असल्यानेच चित्रपट तग धरुन होता, अशातच ३१ मार्च १९७२ रोजी मीनाकुमारीचे निधन झाले. या धक्क्यातून सहानुभूतीची लाट निर्माण झाली. पाकिजा ची गर्दी हळूहळू वाढू लागली. चित्रपट सुपर हिट ठरला आणि मराठा मंदिर चित्रपटगृहात पाकिजा ने तब्बल पन्नास आठवडे मुक्काम केला. ही एक प्रकारची मीनाकुमारीला श्रद्धांजलीच.

मीनाकुमारीच्या खाजगी आयुष्याचीही कायमच बरीच उलटसुलट चर्चा झाली. गॉसिप्स रंगले. त्यात कमाल अमरोही यांच्यासोबतच्या नात्यावर कायमच फोकस पडतो. तिचं व धर्मेंद्रचे संबंध कुतूहल निर्माण करणारे. तिचं पेयपान देखील चर्चेचा विषय. त्यावर अनेक किस्से. चरित्रपटात त्यातलं काय असणार वा दिसणार? चरित्रपटात खाजगी आयुष्यातील गोष्टी दिसाव्यात ही सर्वसाधारण अपेक्षा. गॉसिप्स मॅगझिनमधून जे आलं, दिसलं, सांगितले गेले, त्या पलिकडे जाऊन आणखीन बरेच काही असतेच असते. ते सांगण्या वा मांडण्यासाठी आत्मचरित्र हे माध्यम असते. काही कलाकार आपल्या आत्मचरित्रातून आतापर्यंत जगासमोर न आलेल्या गोष्टी आत्मचरित्रात लिहितात ( ते लिहिताना आपणच बरोबर होतो हे ठसवतात हा मानवी स्वभाव). तर काही कलाकार आपल्या आयुष्यातील खाजगी गोष्टी आपल्याच पाशी रहाव्यात म्हणून आत्मचरित्र लिहित नाहीत. चरित्रपट हे एक प्रकारचे आत्मचरित्रच. माध्यम वेगळे.

पण त्या कलाकाराची (वा खेळाडू, राजकीय नेता वगैरे असेल) भूमिका आता अन्य कोणी साकारते.

मीनाकुमारी चरित्रपटाची निर्मिती सिध्दार्थ मल्होत्रा ( कियारा अडवाणीचा पती), सारेगामा व अमरोही कुटुंब हे मिळून करताहेत. दिग्दर्शन सिध्दार्थ मल्होत्रा करणार आहे. आता फक्त कियारा अडवाणी ही भूमिका साकारणार एवढेच निश्चित झालेय. अजून पटकथालेखन, अन्य कलाकार अशा अनेक गोष्टींसह चरित्रपटाचे नाव निश्चित व्हायचेच. चित्रपटात कमाल अमरोही कोण साकारणार? धर्मेंद्रची व्यक्तिरेखा असेल तर ती कोणाला देणार? पन्नास व साठच्या दशकाचा काळ उभा करण्यात कला दिग्दर्शक यशस्वी ठरेल ना? अंधेरीतील महाकाली येथील कमालीस्तान स्टुडिओत त्यासाठी सेट लावावे लागतील. अशा अनेक गोष्टींसह हा कमल और मीना चरित्रपट पडद्यावर येईल. पण केव्हा हे आत्ताच सांगता येत नाही. कारण आव्हान प्रचंड मोठे आहे. चित्रपट आणि त्यातील गीत संगीत या रुपाने मीनाकुमारीचा प्रवास सिंगल स्क्रीन थिएटर्स अर्थात एकपडदा चित्रपटगृह ते आज ओटीटी असा झाला असला तरी मीनाकुमारी साकारणे सोपे नाही. विशेषत: भावनिक दृश्यातील मीनाकुमारी जास्त प्रभावी होती. ते तिच्या डोळ्यात दिसे, उच्चारातून दिसून येई. त्यात खरेपण वाटे. तेच तात्कालिक समिक्षक व रसिकांना भारी वाटे.

कियारा अडवानीला आंतर्बाह्य बदलावे लागेल. ती काहीशी हेमा मालिनीसारखी दिसते. तिचं सोशल मिडियातील ग्लॅमरस रुप ती चित्रपटासाठी बाजूला ठेवू शकेल. ते करावेच लागेल. ती मीनाकुमारी कशी काय दिसेल हा मात्र प्रश्न आहे, त्याबाबत कुतूहल नक्कीच आहे....या चरित्रपटातून मीनाकुमारीसारख्या एका गुणी अभिनेत्रीची अष्टपैलू अभिनय क्षमता व दिग्दर्शक कमाल अमरोही यांचे तिच्या आयुष्यातील स्थान या गोष्टींसह जुन्या काळातील चित्रपटाचे जग, मानसिकता, दृष्टिकोन, एकमेकांशी असलेले संबंध, भावनिक नाते अशा अनेक गोष्टी आजच्या ग्लोबल युगातील डिजिटल पिढीसमोर येतील...

चित्रपट इतिहासातील नर्गिस, मधुबाला, बलराज साहनी, पद्मिनी, मा. भगवानदादा, दारासिंग यांच्यावरील चरित्रपट माईलस्टोन ठरतील. पण त्या भूमिका साकारण्याच्या ताकदीचे कलाकार खरंच आहेत का याचे उत्तर कोणाकडे आहे? त्यापेक्षा भरपूर संशोधन करुन माहितीपट (डॉक्युमेंटरीज) बनवल्या तर? अशा कलाकारांच्या जुन्या चित्रपटांचे फूटेज, त्यांच्या संबंधित व्यक्ति यांच्या भेटीगाठी, जुन्या काळातील नियतकालिकातील कात्रणे यातून ते शक्य होत जाईल. आणि ते जास्त प्रभावीही ठरेल. त्याचीच तर गरज आहे.

# गायक व संगीतकार सुधीर फडके यांचे स्मरण

प्रसिद्ध मराठी भावगीतगायक आणि चित्रपटक्षेत्रातील निर्माते, संगीतदिग्दर्शक व पार्श्वगायक रामचंद्र ऊर्फ सुधीर विनायकराव फडके यांचा आज स्मृतिदिन. ते बाबूजी या नावाने ते अधिक परिचित होते. त्यांचा जन्म २५ जुलै १९१९ कोल्हापूर येथे झाला. आई सरस्वतीबाई त्यांच्या बालपणीच निवर्तल्या. वडील विनायकराव वकील होते. बाबूजींचे शालेय शिक्षण कोल्हापुरात झाले.

गायनाचार्य पं. वामनराव पाध्ये आणि बाबूराव गोखले यांच्याकडे बाबूजींनी काही वर्षे शास्त्रीय संगीताचे शिक्षण घेतले. प्रतिकूल परिस्थितीमुळे त्यांना वयाच्या चौदाव्या वर्षापासूनच शिकवण्यांचे व संगीत शिक्षकाचे काम करावे लागले. पुढे त्यांनी अधिक संगीतसाधनेसाठी मुंबईला प्रयाण केले (१९३६). तेथेही शिकवण्या, मेळ्यातील गाण्यांना चाली लावून देणे वगैरे करून चरितार्थ चालवला. त्यांच्या गायनाचा पहिला जाहीर कार्यक्रम मिरजेत झाला (१९३१). मुंबईत आकाशवाणीवरील त्यांचा पहिला कार्यक्रम १९३७मध्ये झाला. शिवाय त्यांनी १९३९–४१ दरम्यान खानदेश, विदर्भ, बिहार, पंजाब, राजस्थान, बंगाल अशी भ्रमंती केली. या भ्रमंतीत त्यांना तेथील संगीत जवळून अनुभवावयास मिळाले. कोलकात्यात (पूर्वीचे कलकत्ता) त्यांना एका ग्रामोफोन कंपनीत नोकरी मिळाली, पण प्रकृती अस्वास्थ्यामुळे ती सोडून ते कोल्हापुरास परतले. याच सुमारास त्यांनी हिज मास्टर्स व्हाइस (एचएमव्ही मुंबई) या ध्वनिमुद्रिका संस्थेशी करार करून अनेक गीतांना संगीत दिले व ती गायली (१९४५). त्यावेळी त्यांनी गायलेली ‘दर्यावरी नाच करी’ व ‘झिमझिम पाऊस पडतो’ ही गाणी विशेष गाजली.

१९४६ सालापासून बाबूजींनी एकंदर ८४ मराठी व २२ हिंदी चित्रपटांतील व इतर अशी ८७७ गीते संगीतबद्ध केली, तर १४४ मराठी व नऊ हिंदी चित्रपटांतील व इतर अशी ५११ गीते गायिली. त्यांची अनेक हिंदी–मराठी गाणी अजरामर झाली. जगाच्या पाठीवर, सुवासिनी, हा माझा मार्ग एकला, प्रपंच, संथ वाहते कृष्णामाई, भाभी की चूडियाँ या चित्रपटांचे संगीतदिग्दर्शक व पार्श्वगायक म्हणून त्यांना पारितोषिके मिळाली. १९५५ साली पुणे आकाशवाणीवर प्रसिद्ध झालेल्या आणि साहित्यिक ग.दि. माडगूळकर यांनी रचलेल्या गीतरामायणातील गीतांना बाबूजींनी उत्स्फूर्त चाली दिल्या आणि स्वत: ती गीते गायिली. या स्वरशिल्पाने इतिहास रचला. १९५८पासून गीतरामायणाचे



शेकडो कार्यक्रम महाराष्ट्रासह भारतात आणि परदेशात झाले. आजही गीतरामायण म्हटले की मराठी–अमराठी माणूस भावोत्कट होतो. शब्द व स्वर यांचा रससिद्ध आणि विलक्षण परिणामकारक असा संगम गीतरामायण ऐकताना जाणवतो. गीतरामायणाचे हिंदी, गुजराती, कन्नड, बंगाली व तेलुगू भाषेत रूपांतर झाले. ही सर्व गीते गीतरामायणाच्या बाबूजींनी दिलेल्या चालीवरच गायली गेली.

बाबूजींचा विवाह ख्यातकीर्त पार्श्वगायिका ललिता देऊळगावकर यांच्याशी झाला (१९४९). त्यांचे पुत्र श्रीधर फडके हे आघाडीचे संगीतकार–गायक आहेत.

शास्त्रीय संगीतापासून कोठीसंगीतापर्यंतचे सर्व संगीतप्रकार बाबूजींनी अत्यंत कौशल्याने हाताळले. गायकांनी सुस्वर व सुस्पष्ट उच्चारात गायले पाहिजे असा त्यांचा नेहमी आग्रह असे. त्यांनी कारकीर्दीतील सर्वाधिक सौंदर्यपूर्ण, कालसुसंगत आणि माध्यमानुरूप प्रासादिक संगीतनिर्मिती केली; त्यांच्या गायकीची सुस्पष्ट व अर्थगर्भ शब्दोच्चार, आशयघन भावपूर्णता, प्रसंगी जोशपूर्ण गायकी, आवश्यक तेथे मखमली स्वरलगाव ही बलस्थाने होती. तसेच गाताना त्यांनी वापरलेली श्वासाची तंत्रे, स्वरचिन्हांची आंदोलने, मींडयुक्त स्वरोच्चारण पद्धती अशा अनेक वैशिष्ट्यांमुळे त्यांची गायकी परिणामकारक ठरली. बालगंधर्व, हिराबाई बडोदेकर, कुंदनलाल सैगल यांना ते गुरुस्थानी मानत. या सर्वांच्या संगीताचे श्रवण करून त्यांनी आपली विशिष्ट संगीतशैली निर्माण केली. जी आज ‘फडके स्कूल’ म्हणून ओळखली जाते. मराठी सुगम संगीताचा चेहरा ‘फडके स्कूल’मुळे आमूलाग्र बदलला. त्यांच्या चाळीस वर्षांच्या प्रदीर्घ कारकीर्दीला मराठी चित्रपट संगीताचे ‘सुवर्णयुग’ असे संबोधले जाते.

बाबूजींनी ‘सुलश्री’ प्रतिष्ठान स्थापन करून संगीतविषयक उपक्रम सुरू केले. मराठी चित्रपट महामंडळाचे ते अध्यक्ष होते (१९८०–८५). त्यांना चित्रपटसंगीताबद्दल फाळके पारितोषिक तसेच सर्वोत्कृष्ट संगीत दिग्दर्शक आणि सर्वोत्कृष्ट पार्श्वगायक म्हणून महाराष्ट्र राज्य पारितोषिकेही मिळाली होती. बाबूजींच्या संगीतसेवेबद्दल त्यांना अनेक मानसन्मान लाभले.

बाबूजींच्या जीवनाचा अनोखा पैलू म्हणजे त्यांची प्रखर राष्ट्रभक्ती, ध्येयनिष्ठा, सर्जनशीलता आणि समाजसेवा. ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे निष्ठावान कार्यकर्ते होते आणि काही काळ प्रचारक होते. गोवा मुक्तिसंग्रामात त्यांचा सहभाग होता. दाद्रा व नगरहवेली मुक्तिकरिता बाबूजी आणि त्यांच्या पत्नी ललिताबाई या दोहोंचा सहभाग होता. या संग्रामातील सहभागी देशभक्त मोहन रानडे आणि तेलो मस्कारेन्हस यांच्या सुटकेकरिता बाबुजींनी खूप परिश्रम घेतले. स्वा. सावरकर यांचे ते निस्सीम भक्त होते. त्यांनी सावरकर दर्शन प्रतिष्ठानची निर्मिती केली. स्वातंत्र्यवीर सावरकरांवरील चित्रपट हा त्यांचा ध्यास होता. अनेक अडचणी आणि लोकप्रवादांवर मात करून अखेर त्यांनी वीर सावरकर चित्रपट पूर्ण केला (२००२). त्यांनी अनेक राष्ट्रभक्तिपर गीते गायिली.

वृद्धापकाळाने बाबूजींचे २९ जुलै २००२ रोजी मुंबई येथे निधन झाले. २००३ साली महाराष्ट्र शासनाने बोरीवली–दहिसर उड्डाणपुलाला त्यांचे नाव देऊन त्यांना मरणोत्तर मानवंदना दिली. **(साभार : मराठी विश्वकोष)**

# महान आणि द्रष्टे उद्योगपती जे.आर.डी. टाटा

जहांगीर रतनजी दादाभॉय टाटा उर्फ जे.आर.डी. टाटा हे भारतीय उद्योजक होते. ते भारतातील विमान वाहतूक उद्योगाचे जनक मानले जातात. त्यांचा जन्म २९ जुलै १९०४ रोजी पॅरिसमध्ये झाला. रतनजी दादाभॉय टाटांचे ते दुसरे पुत्र होते. मुंबईतील कॅथेड्रलंड जॉन केनॉन स्कूल येथे काही वर्ष ते शिकले, पण त्यांची आई फ्रेंच असल्यामुळे त्यांचे बालपण मुख्यत: फ्रान्समध्ये गेले. काही कारणाने ते मॅट्रिक परीक्षेपुढे शिकू शकले नाहीत.

इंग्लिश खाडी विमानाद्वारे पहिल्यांदा पार करणारे सुप्रसिद्ध फ्रेंच वैमानिक लुईस ब्लेरिअट यांच्या जीवनकार्याने ते खूप प्रभावित झाले होते. त्यामुळे त्यांनीही विमान शिकण्याचा ध्यास घेतला. १९२९ साली त्यांनी वैमानिकाचा परवाना मिळवला. १९३२मध्ये त्यांनी टाटा एअरलाईन्स या पहिल्या भारतीय प्रवासी विमानवाहतूक कंपनीची स्थापना केली. पुढे १९४६मध्ये तिचे नाव बदलून एअर इंडिया ठेवले गेले. १९३८मध्ये ते टाटा सन्स उद्योगसमूहाचे चेअरमन




बनले. त्यांनी पदभार सांभाळला, तेव्हा टाटा सन्स उद्योगसमूहाच्या १४ कंपन्या होत्या.त्यांच्या काळात ९१ कंपन्यांची भर पडली. रसायन, वाहन, चहा, माहिती, हॉटेले आणि तंत्रज्ञान अशा नवीन क्षेत्रांत त्यांनी टाटा उद्योगसमूहाचा विस्तार केला. त्यांच्या पुढाकाराने कंपनीतील कामगारांच्या कल्याणासाठी खास योजना राबविण्यात आली. त्यामध्ये ‘दिवसातून आठ तास काम’, ‘मोफत आरोग्यसेवा’, ‘भविष्य निर्वाह निधी’ आणि ‘अपघात विमा योजना’ अशा पायाभूत गोष्टींचा समावेश करण्यात आला. त्यांना अनेक पुरस्कार मिळाले. भारतीय केंद्र शासनातर्फे त्यांना १९५७मध्ये पद्मविभूषण, तर १९९२मध्ये त्यांना भारतरत्न पुरस्काराने गौरवण्यात आले. त्यांचे२९ नोव्हेंबर १९९३ रोजी निधन झाले. **(साभार : इंटरनेट)**

# मराठी नाटककार, विनोदकार श्रीपाद कृष्ण कोल्हटकर

मराठी नाटककार, विनोदकार व वाङ्मयसमीक्षक श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांचा जन्म २९ जून १८७१ रोजी विदर्भातील बुलढाण्यात झाला. पुणे आणि मुंबई येथे बी.ए., एलएल. बी. पर्यंतचे शिक्षण झाले. व्यवसाय वकिलीचा असून त्यांनी आपल्या वाङ्मयसेवेचा आरंभ संगीत विक्रमशशिकला नाटकावरील टीकालेखाने (१८९३) केला.

संगीत वीरतनय (१८९६) हे त्यांचे पहिले नाटक. त्यानंतर त्यांनी मूकनायक, गुप्तमंजूष, मतिविकार, प्रेमशोधन, वधूपरीक्षा, सहचारिणी, जन्मरहस्य, परिवर्तन, शिवपावित्र्य, श्रमसाफल्य आणि मायाविवाह ही नाटके लिहिली. उपर्युक्त बारा नाटकांपैकी पहिली आठच रंगभूमीवर आली. ‘साक्षीदार’ हा त्यांचा पहिला विनोदी लेख विविधज्ञानविस्तारात प्रसिद्ध झाला. सुदाम्याचे पोहे अर्थात अठरा धान्यांचे कडबोळे हा त्यांच्या विनोदी लेखांचा संग्रह. त्याची तिसरी आवृत्ती सुदाम्याचे पोहे– अर्थात साहित्य बत्तिशी ह्या नावाने प्रसिद्ध झाली. त्यांचे समीक्षालेख, अध्यक्षीय भाषणे, निबंध कोल्हटकरांचा लेखसंग्रह ह्या नावाने प्रसिद्ध झालेले आहेत. दुटप्पी की दुहेरी आणि श्यामसुंदर ह्या दोन कादंबऱ्या त्यांनी लिहिल्या. त्यांनी काही लघुकथाही लिहिल्या आहेत. गीतोपायन हा त्यांचा कवितासंग्रह. ‘बहु असोत सुंदर संपन्न’ ह्या सुप्रसिद्ध महाराष्ट्रगीताचे ते जनक आहेत. साधारणपणे १९२० पर्यंतच्या त्यांच्या जीवनाचा आढावा त्यांनी आपल्या आत्मवृत्तात घेतला आहे. भारतीय ज्योतिर्गणित ह्या ग्रंथातून त्यांच्या ज्योतिर्गणितविषयक व्यासंगाचा प्रत्यय येतो.

कोल्हटकरांचे नाव घेतले जाते ते मुख्यत: नाटककार, विनोदकार आणि वाङ्मयसमीक्षक म्हणून. त्यांची नाटके जरी त्यांच्या हयातीतच रंगभूमीवर नाहीशी झाली, तरी त्यांचा मराठी नाट्यलेखनावर झालेला परिणाम दुर्लक्षणीय नाही. त्यांच्या पदरचनेने ज्याप्रमाणे रंगभूमीवरील संगीताला वेगळे



आकर्षक वळण लावले, त्याचप्रमाणे त्यांच्या संवादलेखनाने मराठी नाटकांतील संवादांमध्ये खटकेबाजपणा आणि कोटित्व आणले. आपल्या असाधारण कल्पकतेच्या साहाय्याने नाट्यसंवादांतून आणि विनोदी लेखांतून त्यांनी जी विरुद्धकल्पना – न्यासात्मक चमकदार वाक्यरचना – रूढ केली, त्यांचे सुदाम्याचे पोहे हे पुस्तक हा मराठीचा बहुमोल वाङ्मय ठेवा आहे. त्यात संगृहीत झालेल्या त्यांच्या उपहासगर्भ व विनोदी लेखनाने एका अभिनव वाङ्मयप्रकाराला आणि लेखनपरंपरेला जन्म दिला. सुदाम्याचे पोहे मधील लेखन असामान्य कल्पनाविलास व कोटित्व यांच्याबरोबच समाजचिंतनातून जन्माला आलेल्या सामाजिक सुधारणांविषयीच्या पुरोगामी भूमिकेतून स्फुरलेले असल्यामुळे ते जितके रंजक तितकेच विचारप्रवर्तक ठरले. त्यांतून प्रकट होणाऱ्या उपहास विषयांची व्याप्ती फार मोठी आहे. धर्मव्यवहार, सार्वजनिक जीवनव्यवहार, वाङ्मयव्यवहार ह्या आणि महाराष्ट्र समाजजीवनाच्या इतर अनेक व्यवहारांचे कोल्हटकरांनी त्यामध्ये विनोदगर्भ व उपहासगर्भ परीक्षण केले आहे. कोल्हटकरांनी मराठी वाङ्मयविचाराला भरभक्कम असे तात्त्विक अधिष्ठान प्राप्त करून दिले. पुस्तकपरीक्षणे, ग्रंथांना लिहिलेल्या प्रस्तावना, साहित्य संमेलनांतील भाषणे व खास लिहिलेले अभ्यासलेख यांमधून त्यांनी जे मूलभूत स्वरूपाचे वाङ्मयीन प्रश्न वेळोवेळी उपस्थित केले व त्यांची जी शास्त्रीय काटेकोरपणे चर्चा केली, त्यामुळे मराठी वाङ्मयविचाराला योग्य दिशा मिळाली. त्यांच्या असाधारण कल्पकतेला व्यासंगाची, शास्त्रीय दृष्टीची, शिस्तप्रियतेची व परिश्रमशीलतेची सतत जोड मिळाल्यामुळे त्यांचे लेखन अत्यंत भारदस्त व प्रभावी ठरले आणि म्हणूनच विसाव्या शतकाच्या पहिल्या तीन दशकांत कोल्हटकर ही केवळ एक व्यक्ती न राहता ती संस्था बनली होती. त्यांनी केलेल्या साहित्यसेवेबद्दल त्यांना १९२२ साली पुण्यास भरलेल्या द्वितीय कविसंमेलनाचे अध्यक्षपद व १९२७ साली पुण्यासच भरलेल्या महाराष्ट्र साहित्य संमेलनाच्या बाराव्या अधिवेशनाचे अध्यक्षपद देण्यात आले. सांगली येथील ज्योतिष संमेलनाचेही (१९२०) ते अध्यक्ष होते. पुणे येथे ते निधन पावले.**(साभार : इंटरनेट)**

# क्यूआर कोड बंद केल्यामुळे पतसंस्थांच्या व्यवसायावर परिणाम

**अलिबाग : प्रतिनिधी**

राज्यातील पतसंस्थांनी बँकांच्या सहकार्याने आपल्या ग्राहकांसाठी थर्ड पार्टी क्यूआर कोड सेवा सुरु केली होती. परंतु नॅशनल पेमेंट कोर्पोरेशन ऑफ इंडियाने आता पतसंस्थाना क्यूआर कोड सेवा देण्यास बंदी घातली आहे. क्यूआर कोड सेवा बंद केल्यामुळे पतसंस्थांच्या व्यवसायावर परिणाम होत आहे. ही बंदी उठवून पातासंस्थान क्यूआर कोड सेवा सुरु करण्यास परवानगी द्यावी अशी मागणी होऊ लागली आहे.

पतसंस्थांचे जाळे ग्रामीण भागात पसरले आहे. पतसंस्था म्हणजे सरकारचा गावागावातला हात आहे. या स्पर्धेच्या युगात टिकण्यासाठी पतसंस्थाना आपल्या सभासदांसाठी डिजिटल सेवा द्याव्या लागतात. त्यामुळे बऱ्याच पतसंस्थांनी क्यूआर कोड सेवा केली होतो. त्याचा फायदा सदस्य व पतसंस्थाना होत होता. एनपीसीआयने ही सेवा बंद करायला करण्यास सांगितली. त्यामुळे पतसंस्थांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे.

भारत डिजिटल युगाकडे झेप घेतो आहे. एनपीसीआयने क्यूआर कोड सेवा फक्त बँकांना आणि निवडक फिन टेक कंपन्यांना देण्याचं धोरण स्वीकारलं आहे. मात्र, आजही महाराष्ट्रातील हजारो पतसंस्था क्यूआर कोड सेवापासून वंचित आहेत. अशातच काही सक्षम पतसंस्थानी गेल्या दोन वर्षांत आयसीआयसीआय बँक , एअरटेल पेमेंट बँक , आणि एमस्वीप यांच्या सहकार्याने क्यूआर सेवा सुरू केली. परंतु काही पतसंस्थांमध्ये एन्टी मनी लौंड्रीगप्रकरणे घडल्याने सगळ्या पतसंस्थांवर संशय घेतला गेला . एनपीसीआय कडून पतसंस्थांची क्यूआर कोड सेवा बंद करण्यात आली. एनपीसीआयने पतसंस्थांची क्यूआर कोड सेवा बंद नाकारण्याचा निर्णय घेतल्यामुळे शेतकरी आणि छोट्या व्यावसायिकांना त्रास होत आहे. ग्रामीण भागात क्यूआर कोडसाठी प्रचंड मागणी आहे. पण सरकार, एनपीसीआय कडून मान्यता मिळत नाही.

क्यूआर सेवा सुरू केल्यास ग्राहक दररोज व्यवहार करतील . हे पैसे पतसंस्थेच्या खात्यात जमा होतील . यामुळे सीएएसए वाढतो वाढेल. सीएएसए वाढल्यावर पतसंस्थांना स्वस्त दरात कर्ज देता येईल . ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी मिळेल. याचा विचार करून काही अटी घालून पतसंस्थांना थर्ड पार्टी क्यूआर कोड सेवा सुरु करण्यास परवानगी अशी मागणी होऊ लागली आहे.

**आमच्या ४५,००० ग्राहकांपैकी १०,००० पेक्षा अधिक जण क्यूआर मागतात. आम्ही एनपीसीआय कडून सहकार्य मागतोय कारण आम्ही सक्षम आहोत. क्यूआर सेवा ही पैशाची साखळी नाही, तर विश्वासाची लिंक आहे. काही अटी घालून पतसंस्थांना क्यूआर सेवा ही सेवा सुरु करण्यास एनपीसीआयने परवानगी द्यावी**

**–अभिजित पाटील, अध्यक्ष, आदर्श पतसंस्था, अलिबाग**

# श्रीवर्धन तालुक्यात विकासकामांचे भूमिपूजन आणि उद्घाटन



**श्रीवर्धन :प्रतिनिधी, बातमीदार**

श्रीवर्धन तालुक्यात विकासाची गंगा खऱ्या अर्थाने वाहू लागली आहे! केंद्र सरकारच्या पेट्रोलियम व नैसर्गिक वायू मंत्रालयाच्या स्थायी समितीचे अध्यक्ष, खासदार सुनिल तटकरे यांच्या हस्ते श्रीवर्धन तालुक्यातील विविध बहुप्रतिक्षित विकासकामांचे भूमिपूजन आणि उद्घाटन सोहळे मोठ्या उत्साहात पार पडले.

या कार्यक्रमांमुळे श्रीवर्धन तालुक्यातील रस्ते व पायाभूत सुविधा अधिक मजबूत होणार असून स्थानिक नागरिकांच्या दळणवळणाच्या समस्या सुटतील तसेच पर्यटन क्षेत्रालाही मोठी चालना मिळेल, अशी सर्वत्र अपेक्षा व्यक्त होत आहे.

या विकास सोहळ्याचे मुख्य आकर्षण ठरले आंबेत–बागमंडला रस्त्याचे भूमिपूजन. राज्य महामार्ग क्र. १०० (किमी ०/००० ते ३०/०००) या भागातील सुमारे ३० किमी लांबीच्या रस्त्याचे कॉक्रीटीकरण, नवीन पूल आणि मोऱ्या बांधण्याची ही महत्त्वाकांक्षी योजना आहे..एकूण खर्च – तब्बल १२६ कोटी, योजना – महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ, मुंबई – या प्रकल्पामुळे श्रीवर्धन तालुक्यातील रस्त्यांचे जाळे अधिक सक्षम होईल आणि प्रवास अधिक सुरक्षित व सुलभ होईल.


खा. सुनिल तटकरे यांच्या हस्ते जसवली येथे नव्याने पूर्ण झालेल्या रस्त्याचे उद्घाटन झाले. या रस्त्यामुळे स्थानिक गावांमध्ये दळणवळण अधिक सोयीचे आणि सुरक्षित होणार आहे. गावकऱ्यांनी आनंद व्यक्त करत तटकरे यांचे आभार मानले.दिवेआगार – या प्रसिद्ध पर्यटनस्थळीही नूतन रस्त्याचे उद्घाटन करण्यात आले. या विकासामुळे दिवेआगारकडे येणाऱ्या पर्यटकांची संख्या वाढेल आणि स्थानिक अर्थव्यवस्थेलाही बळ मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

यावेळी श्रीवर्धन तालुका अध्यक्ष दर्शन विचारे, मतदारसंघ अध्यक्ष महम्मद भाई मेमन, समीर बनकर, महादेव पाटील, माजी आमदार तुकाराम सुर्वे,सुजित तांदळेकर, बाबुराव चोरगे, शब्बीरभाई फिरफिरे, लालभाई जोशी, विविध अधिकारी, पदाधिकारी आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मीम बनवण्यावरून तासगावकर कॉलेजमध्ये हाणामारी

**नेरळ : प्रतिनिधी**

कर्जतच्या यादवराव तासगावकर कॉलेजमध्ये वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये इंस्टाग्रामवर मीम टाकण्यावरून राडा झाला आहे. यामध्ये अऱ्हांत मनोज लेंडाने या तरुणासह सोबत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी हातातील कडा, बेसबॉल स्टिक, हाताबुक्यांनी मारहाण करून,शिवीगाळ केली आहे. पीडित विद्यार्थ्याने याबाबत कर्जत पोलीस ठाण्यात धाव घेतली असून १२ विद्यार्थ्यांच्या



विरोधात पोलिसांनी ट्रॉसिटी क्ट कायद्या अंतर्गत विविध गुन्हे दाखल केले आहेत.

कर्जत तालुक्यातील चांदई येथील डॉ.एन.वाय.तासगावकर फिजिओथेरपी विभागात फिर्यादी अऱ्हांत लेंडाने हा शिक्षण घेत आहे. अऱ्हांत हा बॉईज हॉस्टेलमध्ये राहत आहे. इंस्टाग्राम आयडीवर रोशन जावणे या विद्यार्थ्यांचा मिम बनवण्यात आल्याने याचा संशय हा अऱ्हांत लेंडाने यांच्यावर होता. यामुळे या विद्यार्थी तरुणांमध्ये सुरुवातीला शाब्दिक बाचाबाची होऊन याचे रूपांतर हाणामारीत झाले. यावेळी हातातील कडा,बेसबॉल स्टिक, हाताबुक्यांनी अऱ्हांत यास मारहाण करून,जातीवाचक शिवीगाळ केल्याचा प्रकार घडला. यावेळी मारहाण केलेल्या तरुणांनी जातीविषक बोलून हिन दर्जाची वागणूक दिल्याची तक्रार कर्जत पोलिस ठाण्यात दाखल झालेली आहे.

पोलिसांनीबारा विद्यार्थ्यांवर गुन्हे दाखल केले असून अधिक तपास कर्जत विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम करीत आहेत.

## राष्ट्रवादीचे अंकुश आपटे शिवसेनेत


**पाली : प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पाली शहर उपाध्यक्ष अंकुश आपटे यांनी नुकताच शिवसेनेत प्रवेश केला. आमदार महेंद्र दळवी यांच्या अलिबाग येथील निवासस्थानी हा पक्षप्रवेश कार्यक्रम झाला.यावेळी, सुधागड तालुका तालुकाप्रमुख रवींद्र देशमुख, जिल्हा संपर्कप्रमुख मिलिंद देशमुख, युवा जिल्हाप्रमुख संजय म्हात्रे, उपजिल्हाप्रमुख अनुपम कुलकर्णी, उद्धव कुथे उपस्थित होते

# रायगड आणि कर्जत मेडिकल असोसिएशनंच्या विद्यमाने योग दिन

**कर्जत : प्रतिनिधी**

रायगड मेडिकल असोसिएशन आणि कर्जत मेडिकल असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने २२ जून २०२६ रोजी रॉयल गार्डन डोम, कर्जत येथे जागतिक योग दिन उत्साहात आणि प्रेरणादायी वातावरणात साजरा करण्यात आला.



कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ. श्रीकांत डहाके, डॉ. प्रभाकर काळे आणि डॉ. आशुतोष कुळकर्णी (अध्यक्ष, रायगड मेडिकल असोसिएशन) आणि ॲड संकेत भासे यांच्या हस्ते झाले. या मान्यवरांनी आपल्या भाषणात योगाचे आधुनिक जीवनशैलीत महत्त्व व तणावमुक्त आरोग्य जीवनासाठी त्याचा उपयोग अधोरेखित केला.

प्रतिश्रुता अधिकारी , प्रतिस्वास्थ्य योग, ठाणे संस्थेच्या संस्थापक – यांनी प्राणायाम, तणावमुक्ती व दैनंदिन योग साधनेवर आधारित सत्र घेतले. आपण सर्वांनी आज केवळ योग केला एवढ्यावर न थांबता, तो आपल्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनवावा – हीच आजच्या कार्यक्रमाची खरी प्रेरणा आहे. आरोग्यदायी डॉक्टर हेच आरोग्यदायी समाजाचे शिल्पकार आहेत असेही सांगितले

डॉ. शर्वाणी कुळकर्णी यांनी सूत्र संचालन केले. योग सत्रांमध्ये १०० हून अधिक ज्येष्ठ नागरिक, हास्य क्लब चे सभासद,डॉक्टर, वैद्यकीय कर्मचारी व नागरिकांनी सक्रिय सहभाग नोंदवून कार्यक्रमात उत्साह आणला.

# लाद्या घेऊन जाणाऱ्या ट्रकचा कर्जतमध्ये भीषण अपघात

**कर्जत , नेरळ : प्रतिनिधी**

लाद्यांची वाहतूक करणाऱ्या भरधाव ट्रकचा कर्जत चार फाटा येथे भीषण अपघात घडला.चौक रस्त्यावरून कर्जत शहराकडे येत असताना रस्त्याच्या उतारावर वाहनाचे ब्रेक फेल झाल्याने हा अपघात घडला.सुदैवाने यामध्ये कुठलीही जीवित हानी झाली नसली तरी अडकलेल्या वाहन चालकाला ट्रकचे केबिन तोडून नागरिकांनी सुखरूप बाहेर काढले आहे.



कायम वाहनांची वर्दळ असणाऱ्या या ठिकाणी सकाळी सात वाजण्याच्या सुमार अपघात घडल्याने मोठी दुर्घटना टळली. वाहन चालकाने देखील प्रसंग अवधान राखत हात करून लोडेड ट्रक थांबवण्यासाठी चार फाट्यावर बांधकाम करीत असलेल्या चबुत्र्यास धडक देऊन ट्रक रस्त्याच्या खोल बाजूस उलटवला.

कर्नाटक राज्यातील ४५ वर्षीय सुनील मलय हा ट्रक चालक वाहनात लाद्या कडाप्पे भरून,पनवेलहून मुरबाड दिशेने जात होता,दरम्यान कर्जत शहराच्या दिशेने भरधाव येत असताना रस्त्याच्या उतारावर ट्रकचे ब्रेक फेल झाल्याने,चालकाने शहराच्या प्रवेशद्वार असणाऱ्या चार फाटा येथे आपल्या केबिन मधून हात बाहेर काढून इतर वाहन चालकाना सावध केले,जेणे करून ट्रकच्या समोर कुठलेही वाहन येऊन अपघात घडू नये.तो ओरडत होता.ट्रक आपल्याकडे येतो का म्हणून ही भीती वाहन चालकांमध्ये होती. परंतु वाहन चालकाने घाबरून वाहनातून उडी मारून पळून न जाता सावध समयसूचकता बाळगून ट्रक विरुद्ध बाजूला बांधकाम तयार होत असलेल्या चबुत्र्यास जाऊन धडकला.

वाहनाच्या केबिन मध्ये अडकलेल्या या वाहन चालकाने मदतीसाठी ओरड घातली. तब्बल एक तासाने या वाहन चालकास क्रेनच्या मदतीने केबिन बाहेर सुखरूप काढून जखमी चालकास उपचारासाठी दवाखान्यात नेण्यात आले आहे.

# संगणक संच व शालेय उपयोगी वस्तूचे वाटप

**मुरुड : प्रतिनिधी**

पिटसई येथील अशोक ल. लोखंडे विद्यालयात इयत्ता पाचवी ते दहावीतील सुमारे ३०० शालेय विद्यार्थ्यांना पुणे येथील उद्योजक संजय मनोहर , व्यावसायिक मोहन वर्तक, सौ .वर्तक मॅडम व सौ. मनोहर मॅडम यांचे कडून त्यांच्या शुभ हस्ते शैक्षणिक वस्तूचे वाटप करण्यात आले आणि त्यांनी शाळेच्या दैनदिन कामासाठी उपयुक्त असणारा संगणक संच सुधा यावेळी भेट देण्यात आला.



कार्यक्रमाच्या सुरुवातीला उद्योजक संजय मनोहर व व्यावसायिक मोहन वर्तक यांचे स्वागत संस्थेचे अध्यक्ष .खेळू वाजे व विद्यालयाचे मुख्याध्यापक अरुण खुळपे यांच्या हस्ते करण्यात आले .संजय मनोहर यांनी आपल्या मनोगतात म्हटले की ,प्रत्येक विद्यार्थी हा चार्टर्ड अकाउंट, इंजिनियर, डॉक्टर ,आर्किटेक्चर होऊन तो देशाचा एक सजग नागरिक पण बनला पाहिजे तसेच विद्यार्थ्यांनी आपले लक्ष गावाकडे, आई–वडिलाकडे तसेच शिक्षणाकडे सुद्धा दिले पाहिजे .सर्व शिक्षकांना व विद्यार्थ्यांना दहा मिनिटे ध्यानधारणाचे प्रात्यक्षिक करून सुद्धा दाखवले. शिंदे व राकेश कासार सुध्दा उपस्थित होते.

# औषधी बहुगुणी ४८२ वृक्ष वनविभागाकडे सुपूर्द

## डॉ.श्री नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानचा उपक्रम

**खालापूर : प्रतिनिधी**

औषधी बहुगुणी अशा सुमारे ४८२ वृक्षाची लागवड आणि चार वर्षे सलग संवर्धन केल्यानंतर डॉ.श्री नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान रेवदंडा कडून वनविभागाकडे वृक्षाचे हस्तांतरण करण्यात आले आहे.



सामाजिक बांधिलकीतून प्रतिष्ठान तर्फे सातत्याने विविध लोकोपयोगी उपक्रम राबवले जातात. खालापूर तालुक्यातील श्री सदस्यांनी प्रतिष्ठानच्या माध्यमातून पाच जुलै २०२१ रोजी वनपरिक्षेत्र असलेल्या हाळ बुद्रुक हद्दीत वृक्ष लागवड केली होती. खडकाळ उजाड माळरान असलेल्या वनविभागाच्या जागेत जवळपास ५०० वृक्ष लागवड करण्यात आली होती. गिरीपुष्प, उंबर, करंज कडुलिंब, आकाश शेवगा, आवळा, गोड चिंच, जांभूळ बाभूळ, बेल, शिसव, विलायती चिंच, सिताफळ, पेरू टाकळा, काशीद ,आपटा यासारख्या जवळपास ५० वेगवेगळ्या प्रकारच्या वृक्षांची लागवड तालुक्यातील श्री सदस्यांनी मिळून केली होती.

वृक्ष लागवडीनंतर संवर्धनासाठी डॉक्टर नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान तर्फे योग्य नियोजन करण्यात आले होते .वेळोवेळी खत, पाणी तसेच आवश्यकतेनुसार वृक्षाभोवती ग्रीन नेट कुंपण करून संगोपन करण्यात आले. उन्हाळ्याच्या दिवसात तालुक्यातील श्री सदस्य वेळोवेळी पाणी देणे तसेच मानवनिर्मित वणव्यापासून झाडांचे संरक्षण करण्यासाठी सुके गवत काढणे यासारखी काम नित्यनेमाने करीत होते. त्याचाच परिणाम चार वर्षानंतर दिसून येत असून खडकाळ माळरानावर निसर्ग बहरला असून अगदी दहा फुटापासून पस्तीस फुट उंचीपर्यंत वृक्षांची वाढ झाली आहे. झाडांची पाळेमळे घट्ट रुजल्यानंतर वनपरिक्षेत्रात जागेत असलेल्या वृक्षांच्या हस्तांतरण वनपरिक्षेत्राधिकारी खालापूर राजेंद्र पवार यांच्याकडे करण्यात आले आहे.

**वृक्ष लागवडीनंतर संगोपन होणे महत्त्वाचे असते. डॉक्टर नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान रेवदंडा यांचे कार्य अलौकिक आहे. पर्यावरणासाठी झालेले काम पुढच्या पिढीसाठी देखील मोलाचे ठरणार आहे.**

**–राजेंद्र पवार, वनपरिक्षेत्र अधिकारी खालापूर**

# माथेरानच्या ज्येष्ठ नागरिकांचे गाऱ्हाणे

**माथेरान: बातमीदार**

माथेरान मधील जेष्ठ नागरिकांनी त्यांना भेडसावणाऱ्या विविध समस्यांबाबत आणि विविध मागण्यांसाठी माथेरान अधीक्षक सुरेंद्रसिंह ठाकूर आणि माथेरान मुख्याधिकारी तथा प्रशासक राहुल इंगळे यांची भेट घेऊन आपले गाऱ्हाणे कथन केले.



माथेरान शहरात जेष्ठ नागरिकांची संस्था कार्यरत आहे.या संस्थेच्या शिष्टमंडळाने गुरू. दि.२६ रोजी माथेरान अधीक्षक सुरेंद्रसिंह ठाकूर आणि नगर पालिका मुख्याधिकारी तथा प्रशासक राहुल इंगळे या दोन्ही अधिकाऱ्यांची अधीक्षक कार्यालयात एकत्रित भेट घेतली.यावेळी संस्थेच्या शिष्टमंडळाने येथील जेष्ठ नागरिकांना भेडसावणाऱ्या वेगवेगळ्या समस्यांबाबत गाऱ्हाणे कथन केले.यामध्ये प्रामुख्याने वीज,पाणी व रस्ते याबाबत चर्चा करण्यात आली.तसेच येथील गॅस वितरण व्यवस्था,संजय गांधी निराधार पेंशन योजना व दस्तुरी नाका येथील बस थांबा याठिकाणी निवारा शेड तयार करणे याबाबत मागणी करण्यात आली. यावेळी भारतीय जनता पक्षाचे कार्यकर्ते तथा माजी नगराध्यक्ष चंद्रकांत जाधव उपस्थित होते

# राजर्षी शाहू महाराज जयंती द. ग. तटकरे महाविद्यालयात साजरी

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे द. ग. तटकरे महाविद्यालय,माणगाव येथे राजर्षी शाहू महाराज यांची १५१ वी जयंती २६ जून रोजी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने करण्यात आले होते.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व राजर्षी शाहू महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य डॉ.बी.एम.खामकर यांनी उपस्थित राहून राजर्षी शाहू महाराजांच्या सामाजिक न्याय, शिक्षण व समतेच्या कार्याचे महत्त्व पटवून दिले. त्यांनी विद्यार्थ्यांना शाहू महाराजांचे आदर्श आचरणात आणण्याचे आवाहन केले.

तसेच उपप्राचार्य डॉ राजेंद्र आचार्य यांनी शाहू महाराज यांच्या संपुर्ण कारकीर्दिवर प्रकाश टाकला.समता, न्याय, बंधुता याचा अवलंब करणारा तसेच शेतकरी वर्ग, मागासवर्गीयांचा, स्त्रीयांचा कैवारी लोकराजा होते. असे आपले मनोगत व्यक्त केले. शाहू महाराज यांचा संघर्ष आणि सामाजिक क्रांती याची आठवण करून देणारा हा कार्यक्रम प्रेरणादायी ठरला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.वृषाली सालस्कर यांनी केले.

# रा.जि.प. सोनगाव शाळेत शैक्षणिक साहित्याचे वाटप

**रोहे :** मावळे स्वराज्याचे प्रतिष्ठान डोंबिवली मुंबई यांच्या सौजन्याने रोहा तालुक्यातील रायगड जिल्हा परिषद शाळा सोनगाव येथे इ.१ ली ते इ.४ थी मध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे व खाऊचे वाटप करण्यात आले.

रायगड जिल्हा परिषद सोनगाव शाळा मावळे स्वराज्याचे प्रतिष्ठान डोंबिवली यांच्या संयुक्त विद्यमानाने शाळेच्या परिसरात उपस्थित मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.या कार्यक्रमास मावळे स्वराज्याचे प्रतिष्ठान डोंबिवलीचे सदस्य प्रशांत हजारे, सुनील सुर्वे, प्रशांत पाटील, नितेश मोहिते, मुख्याध्यापक संतोष धोत्रे, शिक्षक ब्रिजेश भादेकर,व्यवस्थापन समितीच्या उपाध्यक्ष राधा मोहन शेलार, सुशील खांडेकर, फणींद्र खांडेकर, पालक वर्ग,ग्रामस्थ व विद्यार्थी आदी उपस्थित होते.

# महिला बचत गटाकडून २१२ कोटींचे करसंकलन

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महानगरपालिकेच्या मालमत्ताकर विभागाने सन २०२५-२६ या विद्यमान आर्थिक वर्षामध्ये कर संकलन वाढीसाठी महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध अभिनव उपक्रम राबविण्यासाठी पुढाकार घेत आत्तापर्यंत २१२ कोटींचा कर संकलित केला आहे.



यावर्षी बचत गटांच्या महिलांद्वारे बिलांचे घरपोच वाटप, मोबाईल प्लिकेशनच्या साहाय्याने मालमत्ताधारकांच्या माहितीचे संकलन व अद्ययावतीकरण, मालमत्ताकर भरण्यासाठी डिजिटल पद्धतीचा स्वीकार, मालमत्ताकराबाबत शंका निरसन व बिल मिळण्यासाठी व्हाट्सअप चॅटबॉट आणि मालमत्ताकरावर १० टक्क्यांची सवलत योजना अशा विविध प्रकारच्या अत्याधुनिक सेवा सुलभतेने उपलब्ध करून दिल्याने करदात्यांना कर भरण्यासाठी कोणतीही अडचण आलेली नाही.

महानगरपालिकेने यावर्षी आजतागायत २ लाख मालमत्ताधारकांना बिलांचे घरपोच वाटप केल्याने, मालमत्ताधारकांनी कर भरण्यासाठी पुढाकार घेऊन बिलावरील ३० जूनपर्यंत असलेल्या १० टक्क्यांच्या सवलतीचा लाभ घेतला आहे. नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात तब्बल साडेतीन लाखाहून अधिक मालमत्ता असून, मालमत्ताधारकांनी कर भरून १० टक्क्यांच्या सवलतीचा लाभ घेतला आहे. शहरातील मालमत्ताधारकांना पहिल्या तिमाहीमध्येच घरपोच बिल मिळाल्याने, तसेच मालमत्ताकर भरण्यासाठी डिजिटल पद्धतीला पसंती दिल्याने करसंकलनाला गती मिळाली आहे. बचत गटांच्या महिलांना मिळाला 'रोजगार; मालमत्ताकर विभागाच्या पुढाकाराचा 'दुहेरी'लाभ!

मालमत्ताकर विभागाने या आर्थिक वर्षामध्ये मालमत्ताधारकांना बिलांचे वाटप करण्यासाठी अभिनव उपक्रम राबविला. बचत गटांच्या महिलांना मालमत्ता कराचे बिल वाटप तसेच मोबाईल प्लिकेशनद्वारे माहितीचे संकलन व अद्ययावतीकरण करण्याचे विशेष प्रशिक्षण देण्यात आले. या कामासाठी त्यांना प्रतिबिलासाठी योग्य मानधन दिल्याने महिलांना बिल वाटपातून रोजगार निर्माण होऊन त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्याची संधी विभागाने दिली. यातूनच बिलांचे शंभर टक्के वाटप शक्य झाले. त्याचबरोबर, या अभिनव उपक्रमामुळे महिलांचे आर्थिक सक्षमीकरण होण्यास मदत झाली आहे.

गतवर्षीच्या तुलनेत चालू वर्षी फक्त ३० दिवसांतच निम्म्याहून अधिक मालमत्तांपर्यंत बिले पोहोचल्याने, कमी कालावधीत तब्बल २१२ कोटींचा कर संकलित करण्यात आला आहे.

## करदात्यांनी ३० जूनपूर्वी कराचा भरणा करण्याचे आवाहन

नागरिकांना मालमत्ताकर देयक प्राप्त करून घेणे व त्याचा भरणा करणे सुलभ जावे याकरिता विभागामार्फत राबविण्यात आलेले विविध उपक्रम तसेच ऑनलाईन पेमेंटचे वेबसाईट, पोर्टल, डेबिट कार्ड, क्रेडिट कार्ड, जीपे – फोन पे – पेटीएम असे एका क्लिकवर पेमेंट करण्याचे अनेक यूपीआय पर्याय याच लोकाभिमुख कार्यप्रणालीचा एक महत्वाचा भाग आहेत. यामध्ये महिला बचत गटांच्या सहभागातून झालेले बिल वाटप असो तसेच मोबाईल ॲप्लिकेशनद्वारे होत असलेले माहिती संकलन, यातून आपण एक पारदर्शक आणि नागरिकाभिमुख प्रणाली तयार करत आहोत. या डिजिटल उपक्रमांचा करसंकलनावर सकारात्मक परिणाम दिसत असून, याचा फायदा शेवटी शहराच्या विकासासाठीच होणार आहे. तरी सर्व करदात्यांनी या सवलतीचा आणि सुविधांचा लाभ घेऊन वेळेत मालमत्ताकराचा भरणा करावा, असे आवाहन महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी केले आहे.

# सायन-पनवेल महामार्ग व रेल्वे स्टेशन स्वच्छता मोहीम

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महानगरपालिका येथील स्वच्छतेसाठी नेहमीच जागरूक असते. त्याचप्रमाणे रेल्वे स्टेशन परिसराची स्वच्छताही सिडकोच्या अखत्यारित आहे. या ठिकाणच्या अस्वच्छतेचा परिणाम नवी मुंबई शहर स्वच्छतेवर होत असल्याचे लक्षात घेत सायन पनवेल महामार्ग व त्या भागातील ५ रेल्वे स्टेशन्स याची सखोल स्वच्छता मोहीम हाती घेण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

या अनुषंगाने 'स्वच्छ भारत मिशन'च्या वतीने जाहीर करण्यात आलेल्या 'स्वच्छता अपनाओ, बिमारी भगाओ' या १ जुलैपासून सुरू होणा-या अभियानाच्या अनुषंगाने त्यापूर्वीच सुरुवात करीत सायन पनवेल महामार्गावर रविवार, दि.२९ जून २०२५ रोजी सकाळी ७ वाजल्यापासून महामार्गाच्या दुतर्फा 'विशेष सखोल स्वच्छता मोहीम' राबविण्यात येत आहे. त्यासोबतच बेलापूर, नेरूळ, जुईनगर, सानपाडा व वाशी या ५ रेल्वे स्टेशन परिसरातही सखोल स्वच्छता करण्यात येणार आहे.

विशेष म्हणजे या महामार्गाची व रेल्वे स्टेशन परिसराची स्वच्छता करताना रेवदंडा, अलिबाग येथील डॉ.श्री.नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानचे ३५०० हून अधिक श्रीसदस्य पद्मश्री, महाराष्ट्रभूषण डॉ.आप्पासाहेब धर्माधिकारी आणि डॉ.सचिनदादा धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली मोठ्या संख्येने या महामार्ग व रेल्वे स्टेशन परिसर सखोल स्वच्छता मोहीमेत सहभागी होणार आहेत.

या स्वच्छता मोहीमेत लोकप्रतिनिधी, स्वच्छताप्रेमी नागरिक, स्वयंसेवी संस्था प्रतिनिधी, विविध प्रकारच्या संस्था व मंडळांचे सदस्य, विद्यार्थी यांनी सहभागी व्हावे असे आवाहन करण्यात आले आहे.

# वनमंत्र्यांनी घेतला सलग अकरा तास जनता दरबार

**नवी मुंबई : बातमीदार**

राज्याचे वने मंत्री तथा पालघर जिल्ह्याचे पालकमंत्री गणेश नाईक यांचा जनता दरबार गुरुवारी, २६ जून रोजी वाशी येथील विष्णुदास भावे नाट्यगृहात पार पडला. या जनता दरबारामध्ये विविध विषयांवरील ४५० पेक्षा अधिक निवेदने प्राप्त झाली. ६०% निवेदनांवर तात्काळ कार्यवाही करण्यात आली. उर्वरित समस्यांचा निपटारा समयबद्ध रीतीने करून त्याची पोहोच निवेदनकर्त्यांना देण्यात येणार आहे. गुरुवारचा जनता दरबार सलग अकरा तास चालला.



सकाळी दहा वाजता सुरू झालेला नागरिकांच्या समस्या जाणून घेण्याचा सिलसिला रात्री दहा वाजेपर्यंत अविरत सुरू होता. पाणीपुरवठा, शिक्षकांचे प्रश्न, बीएमटीसी कामगारांसाठी नुकसान भरपाई, प्रशासकीय यंत्रणेकडून अन्याय अशा विविध विषयांवर नागरिकांनी निवेदने सादर केली. जनता दरबारास माजी खासदार डॉक्टर संजीव नाईक, नवी मुंबई महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त सुनील पवार यांच्यासह विविध शासकीय, निमशासकीय, जिल्हाधिकारी, महापालिका, पोलीस, वने, वाहतूक नियंत्रण, आरटीओ, शिक्षण अशा विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. प्राप्त निवेदनांवर संबंधित खात्याच्या अधिकाऱ्यांना तात्काळ कार्यवाही करण्याचे निर्देश वने मंत्री नाईक यांनी दिले.

जनतेची कामे करणाऱ्या कार्यतत्पर अधिकाऱ्यांचे कौतुक करताना स्वार्थी आणि भ्रष्ट अधिकाऱ्यांना यावेळी मंत्री नाईक यांनी कानपिचक्या दिल्या. सिडकोच्या आतापर्यंतच्या इतिहासामध्ये घरे विकण्यासाठी कधीच एजन्सीची नेमणूक करण्यात आलेली नव्हती मात्र यंदा ती करण्यात आली आहे. या निर्णया मागचा हेतू तपासण्याची गरज देखील त्यांनी व्यक्त केली. लोककल्याणासाठी वर्तनात सुधारणा करण्याचा सल्ला चुकणाऱ्या अधिकाऱ्यांना मंत्री नाईक यांनी या वेळी दिला.

राज्य सरकारच्या मूलभूत सुविधा निधीतून नवी मुंबई महानगरपालिकेने टो-गो वाहन खरेदी केले आहे. या वाहनाचे लोकार्पण वने मंत्री गणेश नाईक यांच्या हस्ते जनता दरबार प्रसंगी करण्यात आले. टो-गो प्रणाली ही पर्यावरणपूरक असून ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करून त्याचे खतात रूपांतर करते. सदर प्रक्रिया एकाच ठिकाणी करण्यात येत असल्याने जागेची देखील बचत होते.

# खारघरमध्ये अभिनय प्रशिक्षण शिबिर; कलाकार, रंगकर्मी यांच्यासाठी सुवर्णसंधी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका व अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, शाखा पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने आठ दिवसांचे मोफत अभिनय प्रशिक्षण शिबीर, खारघर येथे आयोजित करण्यात आले आहे.

रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल येथे ३० जून पासून या शिबिराची सुरुवात होणार आहे. या शिबिरामध्ये नाट्य व सिनेक्षेत्रातील दिग्गज मान्यवर तज्ज्ञांचे मार्गदर्शन लाभणार आहे. पनवेल महापालिकाक्षेत्रामधील नाट्यकलावंतांना अभिनयासाठी आवश्यक असणाऱ्या गुणांचा विकास होण्यासाठी योग्य प्रशिक्षण मिळावे याकरिता महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांनी महानगरपालिकेमार्फत पुढाकार घेऊन आखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या पनवेल शाखेच्या सहकार्यातून सर्वांसाठी विनामूल्य असे हे अभिनय प्रशिक्षण शिबिर आयोजित केले आहे.

अभिनय शिबिराला मिळालेल्या मोठ्या प्रतिसादामुळे सकाळी ९ ते १२ दुपारी १ते ४ आणि सायंकाळी ५ ते ८ अशा तीन सत्रात शिबिर होणार आहे. दोन गटात हे अभिनय शिबीर घेण्यात येणार आहे. यामध्ये पहिला गट वय वर्षे ८ ते १६ व दुसरा गट १६ ते ६० वया पर्यंत आहे. सकाळी व संध्याकाळी अशा दोन टप्प्यात आठ दिवस हे अभिनय शिबीर होणार आहे. शिबिरासाठी प्रत्येक गटामध्ये ३० /३० प्रशिक्षणार्थी आहेत. या अभिनय शिबीराचा समारोप सात जुलै रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे. सर्व शिबीरार्थींना सहभाग प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.

शिबीरात सहभागी होण्यासाठी संबंधितांनी शामनाथ पुंडे- प्रमुख कार्यवाह- नाट्य परिषद पनवेल शाखा (९८२१७५८१४७), स्मिता गांधी (९३२३४८९६९३), वर्षा कुलकर्णी जनसंपर्क अधिकारी पनवेल महापालिका. (७७१५८१५१२७) या क्रमांकावर अथवा प्रत्यक्ष संपर्क करावा.

**मान्यवरांचे मार्गदर्शन**

या शिबिरासाठी प्रशिक्षक म्हणून नाट्य कलावंत दिग्दर्शक अशोक केंद्रे (मुंबई), मूक अभिनय अभ्यासक संकेत खेडकर (अहिल्यानगर), प्रा. रवी धुताडमल (रिपर्टरी थिएटर -एनएसडी ) प्रा. डॉ. संजय पाटील, ज्येष्ठ लेखक दिग्दर्शक कलावंत धनंजय सरदेशपांडे( पुणे), निर्माता, दिग्दर्शक व कलावंत राजेश पाठक (कल्याण) आदी तसेच इतरही दिग्गज कलावंताचे मार्गदर्शन या शिबीरात होणार आहे. शेवटच्या दिवशी सर्व सहभागी शिबीरार्थींचे सादरीकरण होणार.

# रसायनीत सीसीटीव्ही कंट्रोल रूमचे जिल्हा पोलीस अधिक्षकांच्या हस्ते उद्घाटन



**मोहोपाडा, रसायनी : प्रतिनिधी**

खालापूर पोलिसांनी लोक सहभागातून चौक येथे नवीन इमारत उभारलेली असून तिचा लोकार्पण सोहळा रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक आँचल दलाल यांच्या हस्ते बुधवारी (दि.२५) सायंकाळी करण्यात आला.

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्यभिषेक सोहळ्याच्या आकर्षक फ्रेमचे उदघाटन करत दिप प्रज्वलन होऊन लोक सहभागातून रसायनी पोलीस स्टेशन हद्दीतील ७२ सीसीटीव्ही कॅमेरे यांचा कंट्रोल रूमचा उद्घाटन सोहळा पोलीस अधीक्षक रायगड आँचल दलाल यांच्याहस्ते रसायनी पोलीस ठाणे येथे झाला. रसायनी पाताळगंगा हा औद्योगिक परिसर असल्याने लोकसंख्येत अधिकच वाढ होत आहे.यासाठी सुरक्षेच्या दृष्टीने क्राइम डिटेक्शन वेळेतच करता यावे शिवाय ३६ गावांवर नजर ठेवण्यासाठी ७२ सिसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. यासाठी रेन्हिवास कंपनीचे व्हाईस प्रेसिडेंट राजीव रंजन, ग्रामीण प्रगती फाउंडेशनचे मंगेश डफाळे, प्रिया असोसिएशनचे अध्यक्ष सुनील कदम आदींसह लोकसहभागातून सहकार्य मिळाले.

या वेळी उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम, पोलीस निरिक्षक खालापूर सचिन पवार, पोलीस निरिक्षक रसायनी संजय बांगर, सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रमोद जाधव,पोलिस उपनिरीक्षक प्रमोद हंबीर, पोलीस उपनिरीक्षक प्रकाश माळी, पोलीस उपनिरीक्षक अनुसया ढोणे, मनोज महाडिक, चौक दुरक्षेत्र पोलिस उपनिरीक्षक विशाल पवार, पोलीस उपनिरिक्षक चौक दुरक्षेत्र शिवाजी जुंदरे,उपनिरीक्षक बाळा बहाडकर, खालापूर तालुक्यातील पोलीस व सामाजिक शैक्षणिक राजकीय पाताळगंगा औद्योगिक क्षेत्रातील कंपन्यांचे अधिकारी पोलीस पाटलांसह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात वुमेन्स हायजिनवर सत्राचे आयोजन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात शुक्रवारी (दि.२७) स्टाफ विल्फेअर समिती व वूमेन्स डेव्हलपमेंट सेल यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयातील सर्व शाखेतील द्वितीय व तृतीय वर्षाच्या विद्यार्थिनींच्या आरोग्य प्रश्नांमध्ये अत्यंत महत्वाचा घटक असलेल्या वैयक्तिक स्वच्छतेबाबत जनजागृती करण्यासाठी एक विशेष सत्राचे आयोजन करण्यात आले होते.

या सत्रात महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. माहेश्वरी झिरपे आणि डॉ. रीत ठुले यांनी महाविद्यालयातील द्वितीय व तृतीय वर्षाच्या विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमात विद्यार्थिनींच्या अंतर्गत रोगांविषयी व स्वच्छतेसंबंधीची योग्य माहिती, हायजीन प्रॉडक्ट्सचा सुरक्षित वापर, संसर्गापासून बचावाचे उपाय, तसेच शारीरिक व मानसिक आरोग्य यावर सखोल चर्चा करण्यात आली. यावेळी त्यांनी मुलींनी मासिक पाळीदरम्यान स्वच्छतेकडे दुर्लक्ष केल्यास होणाऱ्या गंभीर परिणामांवर प्रकाश टाकला.

या कार्यक्रमाला विविध वयोगटातील द्वितीय व तृतीय वर्षातील विद्यार्थिनींचा उत्स्फूर्त असा प्रतिसाद लाभला. या वेळी महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी प्रश्न उपस्थित करून आपल्या शंका दूर केल्या. या सत्राचा उद्देश विद्यार्थिनींमध्ये आरोग्यविषयक जागरुकता वाढवणे हा होता. या सत्राचे आयोजन प्रा. रिझवाना मोमीन समन्वयक स्टाफिलफेअर समिती व प्रा. सोनी पांडे समन्वयक वुमन डेव्हलपमेंट सेल यांनी आयोजन केले तसेच दोन्ही समितीतील इतर सर्व प्राध्यापक वृंद शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थिनीनी उपस्थित राहून सहकार्य केले.

# आभार



**पनवेल : पनवेल रायडर्स यांच्या वतीने सायकलवारीचे आयोजन करण्यात आले होते. पनवेल ते पंढरपूर असा ३५५ किलोमीटरचा प्रवास २० जून ते २२ जूनदरम्यान पूर्ण करण्यात आला या सायकलवारीला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी विशेष सहकार्य केले होते. ही वारी यशस्वीरित्या पूर्ण केल्यानंतर पनवेल रायडर्स ग्रुपच्या वतीने माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे आभार व्यक्त करण्यात आले. त्यांना पनवेल रायडर्स ग्रुपच्या वतीने विठ्ठल रखुमाईची मूर्ती भेट देण्यात आली. या वेळी पनवेल रायडर्स ग्रुपच्या उल्का धुरी, मारुती शेलार, हनुमंत कदम, धनंजय धकीते, भुजंग लोखंडे, भगवान जाधव, संगीता जाधव, दीपक नार्वेकर, विलास कळमकर आदी उपस्थित होते.**

# स्वर्गीय चांगू काना ठाकूर यांच्या पुण्यतिथीनिमित्त धार्मिक कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

स्वर्गीय चांगु काना ठाकूर यांच्या पुण्यतिथीनिमित्त दोन दिवस विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन लोकनेते रामशेठ ठाकूर आणि ग्रामस्थ मंडळ शिवाजीनगर यांच्या वतीने येथे करण्यात आले होते. पनवेल तालुक्यातील शिवाजीनगर येथे श्री समर्थ दासबोध ग्रंथ वाचन, चरित्रामृत ग्रंथाचे पारायण, भजन, प्रवचन, किर्तन आणि शनिवारी माऊलींवर पुष्पवृष्टी अश्या विविध अध्यात्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.






स्वर्गीय चांगू काना ठाकूर यांच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या दोन दिवसांच्या अध्यात्मिक कार्यक्रमाला रायगड जिल्ह्याचे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, पनवेल विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख, जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, शकुंतला ठाकूर, पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, नितीन पाटील, चारुशीला घरत, पनवेल पंचायत समितीच्या माजी सदस्य रत्नप्रभा घरत, भरतशेठ ठाकूर, भाजपचे नेते संजय पाटील, माजी नगरसेवक गणेश कडू, माजी नगरसेविका दर्शना भोईर राजेश्री वावेकर, वसंत शेठ पाटील, माजी नगरसेविका कल्पना ठाकूर, वर्षा ठाकूर, अर्चना ठाकूर, अरुण शेठ ठाकूर, केदार भगत, प्रितम म्हात्रे, अमोल ठाकूर यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

# लोकनेते दि. बा. पाटील विद्यालयात पालक-शिक्षक सभा

**कामोठे : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे कामोठे येथील लोकनेते दि. बा. पाटील विद्यालयात छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांचे जयंती निमित्त पालक-शिक्षक सभा झाली.

या वेळी विद्यालयाच्या सल्लागार समितीचे चेअरमन जयदास गोवारी उपस्थित होते. पालक संघाचे प्रतिनिधी मच्छिंद्र कदम, सरिता पिंजारी व्यासपीठावर उपस्थित होते. विद्यार्थिनी प्रतिनिधी शर्वरी शेंडगे व श्रुतिका जानकर यांनी ओघवत्या शैलीत शाहू महाराजांचे विचारा मांडले.

या वेळी श्रेया कदम या विद्यार्थिनींची भारत सरकारच्या प्रेरणा कार्यक्रमासाठी गुजराथ येथे रायगड जिह्यातून निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. विद्यालयाचे गुरुकुल प्रमुख अनिल पाटील सर यांनी संस्थेच्या गुरुकुल उपक्रमाची माहिती दिली. रयत शिक्षण संस्थेने कृत्रिम बुद्धीमत्तेचे रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून विद्यार्त्यांना प्रशिक्षण दिले जाणार असल्याचे पेरवी सर सांगितले तर क्रीडा शिक्षक सहाने सर यांनी क्रीडा,कला क्षेत्राचे महत्व सांगितले.

विद्यालयाचे मुख्याद्यापक तथा विभागीय अधिकारी कोंगेरे सर यांनी स्पर्धा परीक्षांचे महत्व विशद केले. विद्यालयाचे, गावंड सर, पाटील मॅडम, म्हसकर सर, फडतरे मॅडम, खुटले सर, गलांडे सर, गोवारी सर व अन्य सेवकांनी विशेष मेहनत घेऊन कार्यक्रम यशस्वी केला. जयदास गोवारी यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त चॉकलेटचे वाटप केले.

# हरिहरेश्वरच्या समुद्रकिनाऱ्याची सुरक्षा राम भरोसे

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील श्रीवर्धन तालुक्यातील हरिहरेश्वर हे एक प्राचीन तीर्थक्षेत्र व प्रसिद्ध पर्यटनस्थळ. काशीला जसे विधी केल्याचे पुण्य लागते, तसेच दक्षिण काशी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या हरिहरेश्वर क्षेत्रात विधी केल्यास पुण्य मिळते, अशी श्रद्धा आहे. दरवर्षी हजारो भाविक आणि पर्यटक या ठिकाणी येतात. परंतु या परिसराला लाभलेल्या ५८ किलोमीटर लांबीच्या समुद्रकिनाऱ्याच्या सुरक्षेसाठी आवश्यक असलेल्या सागरी पोलीस चौक्यांची अवस्था अत्यंत बिकट झाली आहे. विशेषतः हरिहरेश्वर येथील सागरी पोलीस चौकी गेल्या चार वर्षांपासून पूर्णपणे बंद अवस्थेत असून, इमारत मोठ्या प्रमाणात मोडकळीस आली आहे. स्थानिक ग्रामस्थांनी या चौकीचे नूतनीकरण करून किमान दोन पोलीस कर्मचारी तैनात करण्याची मागणी केली आहे.



१९९३ मध्ये मुंबईत झालेल्या १३ साखळी बॉम्बस्फोटासाठी वापरण्यात आलेले आरडीएक्स श्रीवर्धन तालुक्यातील शेखाडी किनाऱ्यावर उतरविण्यात आल्याचे तपासात उघड झाले होते. त्या पार्श्वभूमीवर हरिहरेश्वर किनाऱ्याचीही जोखीम लक्षात घेऊन १३ जुलै १९९६ रोजी जिल्हा पोलीस अधिक्षकांनी चौकीचे उद्घाटन केले होते. श्रीवर्धन उपविभागीय पोलीस अधिकारी विजयसिंह जाधव व वरिष्ठ फौजदार अशोक जांभळे यांची उपस्थिती होती. हरिहरेश्वर ग्रामपंचायतीने चौकीसाठी जागा दिली होती.

काळानुरूप मनुष्यबळाच्या कमतरतेमुळे काही वर्षात चौकी बंद झाली. स्थानिकांच्या मागणीवरून ती पुन्हा सुरू झाली, पण 'निसर्ग' चक्रीवादळात तिचे मोठे नुकसान झाले होते. माजी सरपंच अमित खोत, सुयोग लांगी व ग्रामस्थांनी स्वखर्चाने डागडुजी केली होती. त्यानंतर काही काळ दोन पोलीस तैनात होते. मात्र गेली चार वर्षे चौकी पूर्णपणे बंद असून, इमारत उध्वस्त अवस्थेत आहे.

या किनाऱ्यावर काही वर्षांपूर्वी संशयास्पद बोट आढळली होती. काही दिवसांपूर्वी पर्यटकांनी होम-स्टे मालकाच्या बहिणीला गाडीखाली चिरडून ठार मारल्याची दुर्दैवी घटना घडली होती.

**पोलीस चौकीसाठी जागा ग्रामपंचायतने दिली आहे. पूर्वी येथे चौवीस तास कर्मचारी असायचे. मात्र चक्रीवादळा नंतर चौकीची दुरवस्था झाली.त्यानंतर आम्ही स्वखर्चाने दुरुस्ती देखील केली.मात्र नंतर प्रशासनाने त्याकडे दुर्लक्ष केले.पोलीस प्रशासनाने येथे पुन्हा कायमस्वरूपी कर्मचारी द्यावा जेणेकरून वाढते पर्यटन,स्थानिक व पर्यटक वादविवाद तसेच वाहतूक नियंत्रणासाठी स्थानिकांना मदत होईल**

**–सुयोग लांगी, माजी सरपंच, हरिहरेश्वर.**

# पेणमध्ये व्यसनमुक्ती जनजागृती रॅली

**पेण : प्रतिनिधी**

तरुणांमध्ये व्यसनाबद्दल जनजागृती करून समाज व्यसनमुक्त निर्माण व्हावा या उद्देशाने पेणमध्ये जनजागृती रॅली काढल्याचे पेणचे पोलिस निरीक्षक संदीप बागुल यांनी सांगितले. २६ जून या जागतिक व्यसनमुक्ती दिनानिमित रायगड पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्या सूचनेनुसार पोलिस प्रशासनाच्या वतीने पेणमध्ये शालेय विद्यार्थी, पत्रकार यांच्या सोबतीने व्यसनमुक्ती रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

या रॅलीत सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश राजपूत, पोलीस उपनिरीक्षक विक्रम नवरखेडे, संतोष चव्हाण, पोलीस निरीक्षक शिल्पा वेंगुर्लेकर व पोलीसवर्ग, शिक्षक उदय मानकवळे, सुनील साळवी, राजेश पाटील, प्रद्युमन म्हात्रे, सुविधा पाटील आदींसह पेण प्रायव्हेट हायस्कूल, सार्वजनिक विद्यामंदिर ज्युनिअर कॉलेज, सो.म.ना. नेने शाळेमधील विद्यार्थी व विद्यार्थिनी सहभागी झाले होते.

पेण पोलीस स्टेशनपासून काढण्यात आलेली रॅली महावीर मार्ग, पं.का. पाटील चौक, राजू पोटे मार्ग, पेण नाका, गांधी मंदिर ते छत्रपती शिवाजी महाराज चौकमार्गे नेऊन पुन्हा पोलीस स्टेशनच्या आवारात या रॅलीचा समारोप करण्यात आला. या वेळी विद्यार्थ्यांना व्यसनमुक्तीची शपथ देण्यात आली.

या उपक्रमात बोलताना प्रा. उदय मानकावळे यांनी सांगितले की, तरुण पिढी व्यसनाच्या अधीन जात असल्याने ते स्वतः चे, कुटूंबाचे व समाजाचे नुकसान करीत असून आपले शरीर निरोगी, तर घर निरोगी व समाज निरोगी.




# रोटरी क्लब खोपोलीच्या अध्यक्षपदी सुनीता चव्हाण

**खोपोली : प्रतिनिधी**

रोटरी क्लब खोपोलीच्या २०२५-२६ या वर्षाकरिता अध्यक्षपदी सुनीता चव्हाण यांची नियुक्ती सर्वानुमते करण्यात आली. या वेळी माजी अध्यक्ष मिलिंद बोधनकर यांनी आपल्या अध्यक्षपदाची सूत्रे चव्हाण यांना रोटरी कॉलर देऊन पूर्ण केली तसेच सेक्रेटरीपदी डॉ. नलिनी रामस्वामी यांची नियुक्ती झाली.

रोटरी क्लब हॉल सहकार नगर येथे हा कार्यक्रम झाला. या वेळी गेल्या वर्षभरात जे रोटरीचे उपक्रम केले त्याची संपूर्ण चलचित्रासहित माहिती क्लबचे सेक्रेटरी दिवाकरन पिल्ले यांनी सादर केली, या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे पीडीजी मोहन पालेशा व एजीई आशिष मेहता उपस्थित होते. रोटरी क्लब खोपोलीचा या वर्षीचा वर्मा मेमोरियल अवॉर्ड हा सामाजिक कार्यकर्ते राजाराम कुंभार यांना मंजू वर्मा व उपस्थित मान्यवर यांच्या हस्ते देण्यात आला.



# पालक शिक्षक संघाची स्थापना

**माणगाव : प्रतिनिधी**

छत्रपती शिक्षण मंडळ कल्याण संचालित सरस्वती विद्यामंदिर वडघर मुद्रे विद्यालयात शैक्षणिक वर्षे २०२५-२६मधील पहिली जनरल पालक झाली. या सभेत माता पालक संघ, पालक शिक्षक संघ व शालेय व्यवस्थापन समितीच्या सदस्यांची निवड करण्यात आली.

उपस्थित पालकांना विद्यालयाचे मुख्याध्यापक गजानन पाटील यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिक्षक अजित शेडगे यांनी केले. शिक्षक सुरेश भेदाटे, विठ्ठल पवार, मनोज सुतार यांचे सहकार्य लाभले. सूत्रसंचालन विद्या शिर्के यांनी केले.

# समाजातील विविध प्रश्न सोडवण्यासाठी जंगम समाज प्रयत्नशील –लक्ष्मणस्वामी जंगम

**रोहा : प्रतिनिधी**

आपण सर्वांच्या सहकाऱ्याने गेले कित्येक वर्षे विविध धार्मिक ठिकाणी पंचक्रोशी जंगम समाजाच्या वतीने तीर्थयात्रा काढण्यात आली आहे. हे करत असताना एकत्रित येत समाजातील विविध अडीअडचणी प्रामुख्याने शैक्षणिक, सामाजिक प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, असे जंगम समाज रोहाचे अध्यक्ष लक्ष्मणस्वामी जंगम यांनी शहरातील ज्येष्ठ नागरिक सभागृहात आयोजित विद्यार्थी गुणगौरव व महिलांचा हळदीकुंकू या कार्यक्रमात व्यक्त केले.



या कार्यक्रमास उपाध्यक्ष मनोहरस्वामी जंगम, माजी अध्यक्ष हरिभाऊस्वामी जंगम, सेक्रेटरी विनोदस्वामी जंगम, खजिनदार अरुणस्वामी जंगम, सहखजिनदार किरणस्वामी जंगम, चिटणीस वीरेंद्रस्वामी जंगम, सल्लागार महादेव सरसंबे, काशिनाथस्वामी जंगम, प्रकाशस्वामी जंगम, संतोषस्वामी जंगम (पुणे), श्रीकांतस्वामी जंगम, राजेंद्रस्वामी जंगम, कृष्णास्वामी, दिगंबरस्वामी, प्रमोदस्वामी, राकेशस्वामी, मयूरस्वामी, मारुतीस्वामी, रमाकांतस्वामी, श्रीकांतस्वामी, गणेशस्वामी, निलेशस्वामी, महेंद्रस्वामी, संतोषस्वामी, रघुनाथस्वामी, रमेशस्वामी, युवराजस्वामी, गोपीनाथस्वामी त्याचबरोबर समाजातील तरुण-तरुणी तसेच ज्येष्ठ-श्रेष्ठ माहेश्वर आणि मोठ्या संख्येने महिलावर्ग या वेळी उपस्थित होता.

या वेळी विनोदस्वामी जंगम यांनी समाजाच्या उन्नतीसाठी जंगम समाजाने एकत्रित येण्याची आवश्यकता असल्याचे सांगितले. महादेव सरसंबे यांनी शासनाच्या विविध योजनांचा लाभ समाजाने घ्यावा, असे म्हटले. किरणस्वामी जंगम यांनी समाज एकत्रित होत असताना यापूर्वी होत असलेल्या शिवपाठसह अन्य उपक्रम चालू राहणार असल्याचे सांगितले. हरिभाऊस्वामी जंगम यांनी पंचक्रोशी जंगम समाजाच्या वतीने राबवण्यात असलेला हा उपक्रम कौतुकास्पद असल्याचे सांगितले.प्रमोदस्वामी जंगम यांनी प्रास्ताविकात पंचक्रोशी जंगम समाजाचे उद्दिष्टे, ध्येयधोरणे सांगितली. प्रगती जंगम यांनीही मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन वीरेंद्रस्वामी जंगम यांनी केले, तर आभार प्रकाशस्वामी जंगम यांनी मानले.

# आणीबाणीतील लोकतंत्र सेनानींचा सत्कार

**रायगड : रामप्रहर वृत्त**

देशातील आणीबाणीला ५० वर्षे पूर्ण झाल्याचे औचित्य साधून केंद्र आणि राज्य सरकारच्या सुचनेनुसार जिल्हा प्रशासन आणि जिल्हा माहिती कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित छायाचित्र प्रदर्शनाचे उद्घाटन जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते आणीबाणीच्या काळातील लोकतंत्र सेनानींना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या स्वाक्षरीचे सन्मानपत्र प्रदान करण्यात आले.

जिल्हाधिकारी कार्यालय आवारात आयोजित कार्यक्रमास उपजिल्हाधिकारी डॉ रविंद्र शेळके जिल्हा माहिती अधिकारी मनीषा पिंगळे आदी उपस्थित होते.



आणीबाणीत तुरुंगवास भोगलेल्या लोकतंत्र सेनानीना जिल्हाधिकारी यांच्या हस्ते प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले. यात गिरीष विष्णू तुळपुळे, नंदकुमार महादेव चाळके, विलास बाब्राव तोडकर, दामोदर हरी देवधर, शांताराम गोविंद तांडेल, शंकर रामचंद्र तुरे, विश्वास नरहरी मुळ्ये, नरेंद्र वासुदेव जाधव, श्रीवधर नरहर करमरकर, नारायण दत्तात्रेय म्हात्रे, विजय ज्ञानदेव घाडगे, सदानंद दिनकर कर्णेकर, अनिल वासुदेव आचार्य, नथुराम रामा गायकर, मधुकर शंकर खोत, रघुनंदन नारायण देशपांडे, जयंत नथु भाटे, प्रमिला लक्ष्मण कुलकर्णी (मिनल मोहन सोमण), नारायण मारुती दळवी, प्रल्हाद कृष्णाजी भाटे, विनायक त्रिंबक गद्रे, सुधीर शंकर महाजन, पद्माकर मार्तंड पिंपुटकर, त्रिंबक कृष्णाजी पुरोहित, दत्तात्रेय गणु साळुंखे, सरिता प्रभाकर गांधी, सुरेखा रत्नाकर कोलते (पत्नी), अलका जयराम जाधव, अलका रणजीत पाटील, राजन एकनाथ ठाकूर, महेश्वर गोपाळ देशमुख, निला गिरिष तुळपुळे, हेमंत मधुसदन कऱ्हाडकर, उत्तरा दत्तात्रेय गांगल, अच्युत जनार्दन कोडगीरे, रूचा अरुण पाठक (कै. अरुण लक्ष्मण पाठक), अनंत गोपाळ साने, सुषमा माधव भावे, प्रकाश शंकर निजामपुरकर, दिनानाथ गोपाळ पोलेकर, शैलेजा विश्वनाथ साठे यांचा समावेश होता. या वेळी लोकतंत्र सेनानींनी आपले अनुभव कथन केले.

# राजमाता जिजाऊ फाऊंडेशनकडून तिघर शाळेत शैक्षणिक साहित्य वाटप



**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील पळसदरी ग्रामपंचायतीमधील तिघर रायगड जिल्हा परिषद शाळेमध्ये राजमाता जिजाऊ फाऊंडेशनच्या माध्यमातून शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले.

राजमाता जिजाऊ फाऊंडेशन संस्थेच्या अध्यक्ष ॲड .पूजा सुर्वे यांच्या माध्यमातून शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. यामध्ये वही, दप्तर, पेन, पेन्सिल इत्यादी शैक्षणिक साहित्याचा समावेश आहे. विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची आवड निर्माण व्हावी याकरिता फाउंडेशनच्या मार्फत असे कार्यक्रम राबवले जात असून या वेळी विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण पहायला मिळाले.

# गावरान मुठ्यांना खवय्यांची पसंती; पकडण्याची लगबग

**पाली : प्रतिनिधी**

पावसाला काही दिवसांपूर्वी सुरुवात झाली आहे. त्यामुळे फक्त पावसाच्या सुरुवातीला मिळणाऱ्या मुठ्यांचे (खेकड्याची एक जात) आगमन झाले आहे. त्यामुळे खवय्ये आनंदी आहेत. आरोग्यवर्धक, चविष्ट व लज्जतदार मूठ्यांना खवय्यांची पसंती असते. गावागावात रात्री अनेकजण मुठे पकडण्याची मज्जा लुटताना दिसत आहेत. स्वादिष्ट मुठ्यांचा जेवणात समावेश म्हणजे एक पर्वणीच.

पावसाच्या सरींमुळे माळरान, शेत, डोंगर उतारावर जमीन ओली झाली. गवताची कोवळी पाती डोलू लागली. त्यामुळे कोवळ्या गवतावर गुजरान करणारे व फक्त पावसाच्या सुरुवातीलाच बाहेर पडणारे मूठे बिळातून बाहेर आलेले पहायला मिळत आहेत. सध्या चिकन मटणाचे भाव वधारले आहेत. अशावेळी फक्त पावसाळ्यात बाहेर पडणारे मुठे खवय्यांना मेजवानी ठरतात.





पहिल्या पावसानंतर आलेले कोवळे गवत खाण्यासाठी मुठे बिळातून बाहेर पडतात. माळरान, शेत, डोंगर, ओहोळ, नदी आणि खाडीच्या किनारी मुठे सापडतात. रात्रीच्या वेळी रिमझिम पावसात हे मुठे गवत खाण्यासाठी बाहेर पडतात. कोवळे गवत आपल्या नांग्यांनी तोडून बिळात नेवून निवांत खातात. लोक मुठे पकडण्यासाठी रात्री बाहेर पडतात. हातात गॅस बत्ती, टॉर्च किंवा जळता टायर घेतला जातो. सोबत मुठे ठेवण्यासाठी सिमेंटची पोती, गोणपाट किंवा प्लास्टिकचा छोटा पिंप किंवा बादली असते. रात्रभर माळरान, शेत, गवताळ भाग किंवा डोगर उतारावर फिरुन मुठे पकडले जातात. बत्तीच्या किंवा टॉर्चच्या उजेडात हे मुठे थांबतात मग दबक्या पावलांनी जावून त्यांना पकडून पोत्यात टाकले जाते. बऱ्याच वेळ फिरुनसुद्धा काही वेळेस मुठे हाती लागत नाही. त्यासाठी निसर्गाची साथ व योग्य परिस्थिती असावी लागते.

इतर खेकड्यांपेक्षा आकाराने लहान असलेल्या मुठ्यांचा रंग तजेलेदार काळ व पिवळा असतो. पाठीचा भाग थोडा गोलाकार वर आलेला असतो. त्याचा रंग काळा पिवळा चकाकणारा असतो. पाय व नांगडे पांढरे-पिवळे तजेलदार असतात. एक नांगडा मोठा, तर एक छोटा असतो. या सर्व वैशिष्ट्यांमध्ये इतर खेकडे आणि चिंबोऱ्या यामध्ये ते उठून दिसतात.

विकत आणण्यापेक्षा अनेक जण मुठे व चिंबोऱ्या पकडणे पसंत करतात. मुठे व चिंबोऱ्या विकून आदिवासी बांधवांसह अनेकांच्या हातालादेखील दोन पैसे मिळतात. काहीजण शेजारी व मित्रपरिवाला भेट म्हणूनदेखील देतात. मुंबई, पुणे आदी शहरांमध्ये राहणारे लोक गावाकडून हमखास मुठे नेतात किंवा आणायला सांगतात.

वाढते प्रदूषण, शहरीकरण व बांधकामे यामुळे मुठ्यांची निवास्थाने व अधिवास नष्ट होत आहे. त्याचप्रमाणे पावसाचा अनियमितपणा या कारणांमुळे प्रजोत्पादन कमी होऊन मुठ्यांची संख्या घटत आहे.

### चविष्ट आणि आरोग्यवर्धक

*आकाराने लहान असले तरी मुठ्यांचे मांस चविष्ट व आरोग्यवर्धक असते. मुठे वेगवेगळ्या प्रकारे आणि पद्धतीने बनवून खाल्ले जातात. त्यातील सर्वात प्रसिद्ध पद्धत म्हणजे मुठ्यांचे कवच काढून त्यामध्ये मुग, तांदूळ किंवा चण्याच्या पिठाचे मिश्रण भरले जाते. हे मिश्रण भरल्यावर धाग्याने पुन्हा कवच बांधून कालवण तयार केले जाते. आतील गराबरोबरच हे भरलेले मिश्रण चविष्ट आणि लज्जतदार लागते.*

# लाईट ऑफ लाईफ ट्रस्टकडून विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

**रेवदंडा : प्रतिनिधी**

लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट या सामाजिक संस्थेच्या अलिबाग विभागामार्फत नुकतेच बोर्ली, वळके, रामराज आणि बेलोशी या चार केंद्रांमध्ये शैक्षणिक साहित्य वाटप कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या वेळी इयत्ता आठवी ते बारावीतील एकूण ४५५ विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले.

लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट ही संस्था २००५पासून देशभर ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी शिक्षणासंदर्भातील उपक्रम राबवित आहे.

कार्यक्रमाला सपना जायपाटील (सरपंच, बोर्ली ग्रामपंचायत), संगीता भगत (मुख्याध्यापिका, रा.जि.प. शाळा चोरढे), गोरक्षनाथ मोहिते, श्री. रसाळ, श्री. खडपे, श्री. शिंदे, सौ. वारगे यांच्यासह शिक्षक, पालक, ग्रामस्थांची उपस्थिती लाभली.

या उपक्रमासाठी आर्या राऊत, अनुजा राउळ, रश्मी अष्टमकर, राणी जाधव, अपेक्षा शेळके, सोनल घरत यांच्यासह इतर शिक्षक व स्वयंसेवकांनी मोलाचे योगदान दिले.



# राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेसाठी महाराष्ट्राचे संघ जाहीर

## सानिका वाकसे, जीवन जाधवकडे नेतृत्व

**मुंबई : प्रतिनिधी**

हरिद्वार येथे होणाऱ्या पहिल्या १८ वर्षाखालील मुले व मुलींच्या राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेकरिता महाराष्ट्राने आपले दोन्ही संघ जाहीर केले. पुणे ग्रामीणच्या सानिका वाकसे हिच्याकडे मुलींच्या, तर परभणीच्या जीवन जाधव याच्याकडे मुलांच्या संघाच्या नेतृत्वाची जबाबदारी सोपविण्यात आली.


सानिका वाकस


जीवन जाधव

नुकत्याच पुणे येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुल येथे झालेल्या राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेतून हा संघ निवडण्यात आला. उत्तर प्रदेशमधील हरिद्वार येथे २८ जून ते १ जुलै या कालावधीत होणाऱ्या पहिल्या राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत हा निवडण्यात आलेला संघ महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करेल.

**असे आहेत संघ**

मुली : सानिका वाकसे (संघनायिका), वर्षा बनसुडे (पुणे ग्रामीण) समीक्षा तुरे (परभणी), बिदिशा सोनार (नाशिक शहर), प्रतीक्षा गुरव (कोल्हापूर), राणी भुजंग (जालना), समीक्षा पाटील (नंदुरबार), सेरेना म्हसकर (मुंबई उपनगर पूर्व), संतोषी थोरवे, कार्तिकी घेनंद (पिंपरी चिंचवड), पूजा चिंदरकर (मुंबई उपनगर पश्चिम), अक्षरा गुरव (रायगड), वैष्णवी इनामदार (सातारा), मिताली गावडे (सिंधुदुर्ग), प्रशिक्षक ज्ञानेश्वर ठोंबरे, व्यवस्थापिका सायली कचरे.

मुले : जीवन जाधव (संघनायक), सारंग रोकडे, ऋषिकेश कदम (परभणी), अथर्व सोनवणे (पिंपरी चिंचवड), हर्षल बागल, जुनेद खाटिक, (जळगाव), स्वराज मुळे (उस्मानाबाद), सोहम कदम (रत्नागिरी), अमोल टिके, तुषार डांगे (छत्रपती संभाजीनगर), स्मित पाटील (ठाणे ग्रामीण), प्रसाद दिघोळे (पिंपरी चिंचवड), सुरज चांदणे (पुणे ग्रामीण), रोहन बिले (पुणे शहर). प्रशिक्षक स्वप्नील शिंदे, व्यवस्थापक आलम सुतार.

# बुमराह दुसऱ्या कसोटीतून बाहेर पडण्याची शक्यता



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

इंग्लंड दौऱ्यावर असलेल्या भारतीय संघाचा प्रमुख वेगवान गोलंदाज आणि हुकमी एक्का जसप्रीत बुमराह याला इंग्लंडविरुद्धच्या दुसऱ्या कसोटी सामन्यातून विश्रांती दिली जाण्याची शक्यता आहे. वृत्तानुसार बुमराहच्या कार्यभाराचे नियोजन (वर्कलोड) करण्याच्या पूर्वनिश्चित धोरणाचा भाग म्हणून संघ व्यवस्थापन हा महत्त्वपूर्ण निर्णय घेऊ शकते.

२ जुलैपासून एजबॅस्टनच्या मैदानावर सुरू होणाऱ्या दुसऱ्या कसोटी सामन्यात बुमराहच्या अनुपस्थितीमुळे भारतीय गोलंदाजीच्या आक्रमणाची धार बोथट होऊ शकते. त्यामुळे ही एक विचारपूर्वक केलेली रणनिती आहे की इंग्लंडच्या भूमीवर पत्करलेली मोठी जोखीम हे पाहणे निर्णायक ठरेल.

पाठीच्या दुखापतीमुळे दीर्घकाळ संघाबाहेर राहिल्यानंतर अलीकडेच कसोटी क्रिकेटमध्ये पुनरागमन केलेल्या बुमराहने लीड्समधील पहिल्या डावात २४.४ षटके गोलंदाजी केली. क्षेत्ररक्षणात सहकाऱ्यांकडून वारंवार निराशा पदरी पडूनही त्याने उत्कृष्ट गोलंदाजी करत पाच बळी मिळवले. कसोटी क्रिकेटमध्ये पाच बळी घेण्याची त्याची ही १४वी वेळ होती.

दरम्यान, पहिल्या कसोटीत केलेल्या भेदक माऱ्यानंतर आता बुमराहच्या जागी संघात कोणाला संधी मिळणार आणि भारतीय संघ या आव्हानाला कसा सामोरा जाणार याकडे सर्व क्रिकेटप्रेमींचे लक्ष लागले आहे.



# राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्राला सर्वसाधारण विजेतेपद

## क्रीडा आयुक्त शीतल तेली-उगले यांच्याकडे करंडक सुपूर्द

**पुणे : प्रतिनिधी**

खेलो इंडिया युवा स्पर्धे पाठोपाठ राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धेतही सर्वसाधारण विजेतेपदकाचा करंडक महाराष्ट्राने पटकविला आहे. विजेतेपदकाचा करंडक क्रीडा व युवक कल्याण विभागाच्या आयुक्त शीतल तेली-उगले यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला आहे.

गतविजेत्या महाराष्ट्राने अपेक्षेप्रमाणे सर्वोत्तम कामगिरी करीत ६८व्या राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धेतही महाराष्ट्राने सर्वसाधारण विजेतेपदाचा पराक्रम केला आहे. १९७ सुवर्ण, १५९ रौप्य, १७४ कांस्य अशी एकूण ५३० पदकांची लयलूट करीत महाराष्ट्राने अव्वल स्थानाचे शिखर सर केले.

पुण्यातील शिवछत्रपती क्रीडा संकुलात विजेतेपदकाचा करंडक क्रीडा व युवक सेवा संचलनालय आयुक्त शीतल तेली-उगले यांच्याकडे सहसंचालक सुधीर मोरे, उपसंचालक उदय जोशी यांनी सूपूर्द केला आहे. या वेळी उपसंचालक संजय सबनीस, क्रीडा अधिकारी अरुण पाटील उपस्थित होते.

# प्रज्ञानंदची जेतेपदावर मोहोर; 'लाइव्ह रेटिंग'मध्येही अव्वल भारतीय बुद्धिबळपटू

**ताश्कंद : वृत्तसंस्था**

ग्रँडमास्टर आर. प्रज्ञानंदने ताश्कंद, उझबेकिस्तान येथे झालेल्या 'उझचेस' चषक मास्टर्स स्पर्धेचे जेतेपद पटकावताना 'लाइव्ह रेटिंग'मध्ये भारताचा अव्वल बुद्धिबळपटू होण्याचा मानही मिळवला. त्याने जगज्जेत्या दोम्माराजू गुकेशला मागे टाकले.




'उझचेस' स्पर्धेत अखेरच्या फेरीनंतर प्रज्ञानंद, तसेच घरच्या प्रेक्षकांसमोर खेळणारे नोदिरबेक अब्दुसत्तोरोव आणि जावोखिर सिंदारोव यांचे समान ५.५ गुण होते. बरोबरीची ही कोंडी फोडण्यासाठी अतिजलद प्रकारातील टायब्रेकरचा अवलंब करण्यात आला. यातही तिन्ही खेळाडू समान दोन गुणांवर होते. मात्र, अखेरच्या फेरीत १९ वर्षीय प्रज्ञानंदने काळ्या मोहऱ्यांनी खेळताना अब्दुसत्तोरोवला नमवत जेतेपदावर मोहोर उमटवली. आतापर्यंतच्या कारकीर्दीतील ही त्याची सर्वोत्तम कामगिरी आहे. गुकेशची एलो २७७६.६ गुणांसह पाचव्या स्थानावर घसरण झाली आहे. त्यामुळे 'लाइव्ह रेटिंग'मध्ये प्रज्ञानंद प्रथमच भारताचा अव्वल बुद्धिबळपटू ठरला आहे.

केवळ मॅग्नस कार्लसन (२८३९.२ गुण), हिकारू नाकामुरा (२८०७) आणि फॅबियानो कारुआना (२७८४.२) हे तिघे त्याच्याहून वरच्या क्रमांकावर आहेत.३ प्रज्ञानंदने 'उझचेस' चषक मास्टर्स स्पर्धा जिंकताना वर्षातील तिसऱ्या जेतेपदाची नोंद केली. याआधी त्याने टाटा स्टील आणि ग्रँडचेस टूर सुपरबेट क्लासिक या स्पर्धा जिंकल्या होत्या. याच महिन्यात स्टेपन अवाग्यान स्मृती स्पर्धेत त्याने उपविजेतेपद मिळवले होते.

# जोफ्रा आर्चरचे इंग्लंड संघात पुनरागमन

**लंडन : वृत्तसंस्था**

भारत आणि इंग्लंड यांच्यातील पाच कसोटी सामन्यांच्या मालिकेतील दुसरा सामना २ जुलैपासून खेळवला जाणार आहे. दरम्यान, इंग्लंडने दुसऱ्या कसोटीसाठी आपला संघ जाहीर केला आहे. यामध्ये वेगवान गोलंदाज जोफ्रा आर्चरचे प्रदीर्घ कालावधीनंतर कसोटी संघात पुनरागमन झाले आहे.



इंग्लंड आणि वेल्स क्रिकेट बोर्डाने (ईसीबी) भारत-इंग्लंड कसोटी मालिकेतील केवळ पहिल्या सामन्यासाठी संघ जाहीर केला होता. आता ईसीबीने दुसऱ्या कसोटी सामन्यासाठी संघ घोषित केला आहे. यामध्ये जोफ्रा आर्चरचा समावेश करण्यात आला आहे.

आर्चर सुमारे चार वर्षांनंतर कसोटी क्रिकेटमध्ये पुनरागमन करत आहे. अलीकडेच तो काउंटी क्रिकेट खेळताना दिसला होता, तेव्हापासूनच तो लवकरच इंग्लंडच्या कसोटी संघात स्थान मिळवेल, असा अंदाज वर्तवण्यात येत होता.

विशेष म्हणजे संघाने जोफ्रा आर्चरच्या रूपाने एका अतिरिक्त खेळाडूला संघात स्थान दिले आहे, म्हणजेच त्याच्या जागी कोणालाही वगळण्यात आलेले नाही.

आर्चर हा जगातील सर्वात घातक गोलंदाजांपैकी एक मानला जातो. भारतीय संघाने पहिला सामना आधीच गमावला आहे. त्यामुळे आता आर्चरच्या पुनरागमनामुळे टीम इंडियाच्या अडचणी आणखी वाढू शकतात. आर्चरचा संघात समावेश झाल्यामुळे त्याचे अंतिम ११मधील स्थानही जवळपास निश्चित मानले जात आहे.

आता इंग्लंड कोणत्या वेगवान गोलंदाजाला अंतिम संघातून वगळणार हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल. ख्रिस वोक्सचे खेळणे जवळपास निश्चित आहे. त्यामुळे कदाचित जॉश टंगला संघाबाहेर बसावे लागू शकते. याचाच अर्थ पहिला सामना जिंकूनही इंग्लंडच्या अंतिम संघात बदल होणार अशी शक्यता आहे.

इंग्लंडचा संघ : बेन स्टोक्स (कर्णधार), जोफ्रा आर्चर, शोएब बशीर, जेकब बेथेल, हॅरी ब्रूक, ब्रायडन कार्स, सॅम कुक, जॅक क्रॉली, बेन डकेट, जेमी ओव्हरटन, ओली पोप, जो रूट, जेमी स्मिथ, जॉश टंग, ख्रिस वोक्स.







पनवेल : श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि भाजप उलवे नोड यांच्या संयुक्त विद्यमाने गव्हाण विभागातील गरजू विद्यार्थ्यांना मोफत वह्यावाटपाचा कार्यक्रम शुक्रवारी झाला. या अंतर्गत रायगड जिल्हा परिषदेच्या शिवाजीनगर, कोपर, शेलघर, बेलपाडा व गव्हाण कन्या आणि जि.प.शाळेतील विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाला भाजपचे ज्येष्ठ नेते अरुणशेठ भगत यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.







# श्रीलंका बांगलादेशावर वरचढ

## पराभूत करत मालिका घातली खिशात

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप २०२५-२०२७ स्पर्धेला दमदार सुरुवात झाली आहे. पहिल्याच मालिकेत श्रीलंका बांगलादेशवर वरचढ ठरली आहे. दोन सामन्यांची कसोटी मालिका १-० ने खिशात घातली आहे. बांगलादेशने नाणेफेकीचा कौल जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला, पण हा निर्णय फसला असेच म्हणावे लागेल. कारण पहिल्या कसोटी सामन्याप्रमाणे या सामन्यात काही खास करता आले नाही. संपूर्ण संघ २४७ धावांवर तंबूत परतला. त्यानंतर श्रीलंकेने पहिल्या डावात ४५८ धावांची मोठी खेळी केली. पहिल्याच डावात २११ धावांची आघाडी असल्याने बांगलादेशचा पराभव निश्चित झाला होता. बांगलादेशची आघाडी मोडून काढताना दमछाक झाली. बांगलादेशचा संपूर्ण संघ अवघ्या १३३ धावांवर बाद झाला. श्रीलंकेने हा सामना एक डाव आणि ७८ धावांची जिंकला. या विजयासह श्रीलंकेने मालिका १-० ने जिंकली. या विजयासह श्रीलंकेला वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप गुणतालिकेतही फायदा झाला आहे. विजयी टक्केवारी ६६.६७ टक्के झाली असून तिसऱ्या स्थानावर आहे.




श्रीलंकेचा कर्णधार धनंजय डी सिल्वा याने सांगितले की, दोन्ही सामन्यांमध्ये फरक होता. गोलंदाज आणि फलंदाजांनी येथे कामगिरी केली. गोलंदाजांकडे त्यांच्या योजना होत्या आणि त्यांनी त्या योजना अंमलात आणल्या. हे आमच्यासाठी मनोबल वाढवणारे आहे, आम्ही विरोधी संघावर दबाव आणण्यात यशस्वी झालो. दिनुशाने गोलंदाजीत महत्त्वाचे यश मिळवून दिले. जेव्हा तुमच्याकडे मजबूत बेंच स्ट्रेंथ असते तेव्हा हे एक चांगले लक्षण आहे. निस्संका तिन्ही फॉरमॅटमध्ये चांगली कामगिरी करत आहे आणि करत राहील.

जीवेत् शरदः शतम्!
अमित पाटील
यांना वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा

शुभेच्छुक
शिवकुमार त्यागी

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com